**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख सादेख शेख वाहेद,<br>रा. फुलेनगर, केज, तालुका केज, जिल्हा बीड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक वेतन पथक (प्रा.), वेतन पथक कार्यालय, जिल्हा परिषद, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक वेतन पथक (प्रा.), वेतन पथक कार्यालय, जिल्हा परिषद, परभणी - श्री. भातलवंडे एम. एल. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी - प्रतिनिधी - श्री. शिरसाठ यु. आर. कनिष्ठ लिपिक | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - मुख्याध्यापक, कामेल उर्दू प्राथमिक शाळा, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २८-१०-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, प्रश्नाधीन शाळेचे मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी होते. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक ०१-०७-२००९ रोजी पाठविला. मुख्याध्यापकाने अजून माहिती पाठविलेली दिसत नाही व आयोगाच्या पुढील कागदपत्रावरुनही तसे आढळून येत आहे. याकरिता सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्रकरणात मुख्याध्यापक, कामेल उर्दू प्राथमिक शाळा, परभणी यांची साक्षही आयोगास आवश्यक वाटते. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>अंतरीम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०६-०१-२०११ रोजी दुपारी ०३-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व मुख्याध्यापक, कामेल उर्दू प्राथमिक शाळा, परभणी, यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक आहे. मुख्याध्यापक, कामेल उर्दू प्राथमिक शाळा, परभणी, यांची साक्ष आवश्यक असल्याने त्यांनी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख सादेख शेख वाहेद, रा. फुलेनगर, केज, तालुका केज, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक वेतन पथक (प्रा.), वेतन पथक कार्यालय, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्याध्यापक, कामेल उर्दू प्राथमिक शाळा, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नारायण ग्यानबा बापमारे, : अपीलकर्ता
मु. पो. मंगरुळ नं.१, तालुका माजलगाव, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हा परिषद बांधकाम, उपविभाग माजलगाव, जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग
क्रमांक २, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१३३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नारायण ग्यानबा बापमारे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम, उपविभाग माजलगाव, जिल्हा बीड - श्री. व्हि. एम. हन्नमसागर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक २, बीड - श्री. एम. एम. सिद्दीकी | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. सी. एम. तोटावार (शाखा अभियंता) | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-०२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती दिनांक ०५-०२-२००९ रोजी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठविली आहे व ही माहिती अपिलार्थीस मिळाली आहे. त्यावर अपिलार्थीचे समाधान झालेले नाही. काही मुद्दयावरील माहिती चुकीची आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे.

अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १, ४ व ५ ची संपूर्ण माहिती अपिलार्थीस मिळाली आहे असे दिसते यास अपिलार्थीने सहमती दर्शविली आहे. तथापि मुद्दा क्रमांक २, ६ व ७ या मुद्दयावर अपिलार्थीला मिळालेली माहिती चुकीची आहे,असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. तरी अपिलार्थी यांचे समाधान होणे आवश्यक असल्यामुळे कार्यकारी अभियंता जे या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी सुध्दा आहेत त्यांनी दिनांक ३०-१२-२०१० रोजी सकाळी ११-०० वाजता अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात बोलावून समक्ष चर्चा करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या साक्षांकीत छायांकित प्रती अपिलार्थीस विनामूल्य हस्तांतरीत कराव्यात. या पार्श्र्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस दिनांक ३०-१२-२०१० रोजी सकाळी ११-०० वाजता त्यांच्या कार्यालयात बोलावून समक्ष चर्चा करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या साक्षांकित छायांकित प्रती अपिलार्थीस विनामूल्य हस्तांतरीत कराव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १६-१२-२०१०**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नारायण ग्यानबा बापमारे, मु. पो. मंगरुळ नं.१, तालुका माजलगाव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम, उपविभाग

माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक २, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मधुकर पंढरीनाथ ठोंबरे,<br>मु. पो. उंदरी, तालुका केज, जिल्हा बीड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१३४१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मधुकर पंढरीनाथ ठोंबरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड - प्रतिनिधी - श्री. टी. वाय. जाधव, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - सौ. ठोंबरे एस. एम. | : | अनुपस्थित |
| ३.५ | अपर विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. आर. एम. साळोक, नायब तहसीलदार (अपील) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-०७-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी संपूर्ण माहिती पुरविलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक १३-११-२००९ रोजी अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती नियमानुसार देय आहे व ती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यात यावी असा निर्णय दिला. तथापि जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस ही माहिती दिलेली नाही ही बाब आयोगास गंभीर वाटते.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले की, त्यांनी मराठवाडा ग्रामीण बँकेकडे नॅशनल हॉर्टिकल्चर लागवडीसाठी अर्ज केला होता. या प्रकरणासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडे लोकशाहीदिनाअंतर्गत त्यांनी अर्ज केला होता. या अर्जावर जिल्हाधिकारी कार्यालयाने काय कार्यवाही केली व या बँकेकडून उत्तर प्राप्त झाले आहे किंवा कसे याबाबतची माहिती अपिलार्थीस अपेक्षित आहे. आयोगास ही माहिती सरळ असल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे हा झालेला विलंब अनाकलनीय आहे. अपिलार्थीस त्वरीत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी अपिलार्थीने मागितलेली व वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पुरवावी व याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १६-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर पंढरीनाथ ठोंबरे, मु. पो. उंदरी, तालुका केज, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. माणिक देविदास कोकाटे, : अपीलकर्ता
रा. नाथ चित्रमंदिरासमोर, परळी, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. माणिक देविदास कोकाटे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपिक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ, जिल्हा बीड - श्री. व्ही. बी. केरुरकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ, जिल्हा बीड - श्री. एल. पी. कुलकर्णी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३०-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी त्यांच्या वकिलासह, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीस दिनांक १२-०८-२००९ रोजी तत्कालीन प्राचार्यांनी माहिती दिली आहे. यावर अपिलार्थीच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, मिळालेली माहिती ही अपूर्ण आहे. आयोगासमोर दिनांक १२-०८-२००९ रोजीचे पत्र आहे. अपिलार्थीस थोडक्यात खालीलप्रमाणे माहिती हवी आहे. असे सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकल्यावर स्पष्ट होत आहे.

१. मुद्दा क्रमांक १ : माहिती पुरविण्यात आली आहे.

२. मुद्दा क्रमांक २ : या मुद्दयामध्ये प्राचार्यातर्फे शासनाकडे आकृतबंधाचे जे तक्ते पाठविण्यात आले आहेत त्यामध्ये मूळ पदे, कमी केलेली पदे, सध्या प्रस्तावित केलेली पदे इ.पदनिहाय माहिती दिलेली असते,ती देणे अपेक्षित आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे ही माहिती उपलब्ध आहे व ते अपिलार्थीस देऊ शकतात.

३. मुद्दा क्रमांक ३ : या मुद्दयामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अशी आहे की, जी पदे आकृतीबंधामध्ये कमी झाली ती सरप्लस सेलकडे वर्ग करण्यात आली किंवा कसे याबाबत झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती आणि समायोजित झाली नसल्यास त्या पदावर माहिती अर्जाच्या दिनांकापर्यंत पगारापोटी किती खर्च झाला आहे याची माहिती द्यावी. प्राचार्य ही माहिती देऊ शकतात, असे सुनावणीच्या वेळी आढळून आले.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती आज रोजी सुनावणीच्या वेळी वरीलप्रमाणे स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी व ही बाब जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांनी विभाग प्रमुख म्हणून व्यक्तिशः पहावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. माणिक देविदास कोकाटे, रा. नाथ चित्रमंदिरासमोर, परळी, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपिक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाबासाहेब बळीराम मुंढे, : अपीलकर्ता
रा. विद्यानगर (पश्चिम), बीड, तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बाबासाहेब बळीराम मुंढे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे सांगितले की, दिनांक २७-१०-२००९ रोजीच्या पत्रान्वये रुपये ८ माहितीपोटीच्या शुल्काप्रीत्यर्थ बँकेत भरावे असे पत्र त्यांना उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक संस्था, बीड यांच्याकडून प्राप्त झाले. त्यानुसार त्यांनी दिनांक ०७-११-२००९ रोजी ८ रुपये स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा बीड येथे भरले. अपिलार्थीने पुढे असेही सांगितले की, त्यानंतर त्यांना ब-याच कालावधीनंतर म्हणजे दिनांक ०७-०१-२०१० रोजी माहिती मिळाली. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली तथापि शुल्क भरुनही विलंबाने माहिती प्राप्त झाली आहे. अर्जदार सेवानिवृत्त अधिकारी असून त्यांच्या पेन्शनकरिता त्यांना कागदपत्रे पाहिजे होती असा त्यांनी युक्तिवाद केला आहे. या पार्श्वभूमीवर प्रकरण त्वरीत हाताळणे अपेक्षित होते परंतु तसे घडलेले नाही. झालेल्या विलंबाबाबत संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचा खुलासा सहमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,औरंगाबाद यांनी तात्काळ मागवून पुढील कार्यवाही योजावी.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-१२-२०१०** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबासाहेब बळीराम मुंढे, रा. विद्यानगर (पश्चिम), बीड, तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सहमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वसंत संपतराव मुंडे, : अपीलकर्ता
गौरीकुंज मार्केट, परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
अंबाजोगाई, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. वसंत संपतराव मुंडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जिल्हा बीड - श्री. राजेंद्र शालीग्राम पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद - श्री. एस. के. नवटाके | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३-०३-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४-०३-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५-०४-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६-०७-२००८ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-०९-२००८

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे सांगितले की, मागील एका प्रकरणामध्ये त्यांना हजेरीपटाच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य देण्याचे आदेश आयोगाने दिले होते. त्यानुसार झेरॉक्स प्रती विनामूल्य मिळाव्या या अनुषंगाने या प्रस्तुत अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून झेरॉक्स प्रती काढण्याकरिता आलेल्या एकूण खर्चाच्या रुपये ६३,८४० च्या दोन पावत्या (रु. ५०,०००/- व रु. १३,८४०/-) होत्या त्याच्या झेरॉक्स प्रती मिळाव्या किंवा याबाबत शासनाकडील कोणत्या लेखाशीर्षाखाली हा खर्च झाला आहे त्या तपशीलाच्या छायांकित प्रती देण्यात याव्यात. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीमध्ये बँकेच्या चलनाच्या प्रती यांचा उल्लेख केल्यामुळे जन माहिती व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा संभ्रम झाला असे आयोगास दिसून आले. या बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे रुपये १३८४० व रुपये ५०००० च्या झेरॉक्स प्रती खर्चापोटी येणा-या खर्चाच्या बिलाच्या साक्षांकीत प्रती त्वरित देणे अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणे रुपये १३८४० व रुपये ५०००० च्या झेरॉक्स प्रती खर्चापोटी येणा-या खर्चाच्या बिलाच्या साक्षांकीत प्रती (दोन पावत्या) किंवा वर नमूद केल्याप्रमाणे झालेल्या लेखाशीर्षाखालील खर्चाच्या तपशीलाच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस पुरवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वसंत संपतराव मुंडे, गौरीकुंज मार्केट, परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सुभाष साहेबराव नाकलगावकर, | : | अपीलकर्ता |
| | मु. पो. सम्राट अशोकनगर, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, केज, जिल्हा बीड | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड | | |
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, केज, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड - श्री. बी. एस. जाधव | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. दामोधर दत्तात्रय शिनगारे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७-०८-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २५-०९-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४-११-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-१२-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १, २, ३, ५, ८ व १० शी संबंधित माहिती दिनांक २५-०९-२००८ रोजी अपिलार्थीस देण्यात आलेली आहे. या प्रकारची नोंद जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०४-११-२००८ रोजीच्या अपिलावर निर्णय देताना निष्कर्षात घेतली आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी मुद्दा क्रमांक ४, ६ व ९ शी संबंधित माहिती ८ दिवसात विनाशुल्क द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना निर्देश दिले होते.

आज रोजी आयोगासमोर अपिलार्थीचे दिनांक १७-०५-२०१० रोजीचे पत्र आहे. त्यामध्ये अपिलार्थीने नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक ती सर्व माहिती मिळालेली आहे व ते दिनांक १६-१२-२००८ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील परत घेत आहेत. यावरुन अपिलार्थीस पूर्ण माहिती मिळाली आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुभाष साहेबराव नाकलगावकर, मु. पो. सम्राट अशोकनगर, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. गोविंद रावसाहेब पवार,<br>रा. मु. पो. अंमळनेर, तालुका पाटोदा, जिल्हा बीड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कुलगुरु, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>परीक्षा नियंत्रण अधिकारी, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गोविंद रावसाहेब पवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (परीक्षा),<br>मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी - श्री. बी. एम. गोरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव,<br>मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी - डॉ. ब. भ. भोसले,<br>(विभाग प्रमुख - कीटकशास्त्र) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थी यांना त्यांच्या पाल्याच्या उत्तरपत्रिका गुण पडताळणीसंदर्भात दिलेल्या अर्जाबाबत पाल्याची गुण पडताळणी करुन देण्यात आलेली आहे. तव्दतच अपिलार्थीने त्यांच्या पाल्याच्या उत्तरपत्रिकेच्या सत्यप्रती मागणीबाबत स्वारस्य दाखविले असता, केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ मधील पोटकलम (छ) मधील तरतुदीनुसार त्यांना उत्तरपत्रिका देता येणे शक्य नाही तसेच उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रती देण्याची तरतूद नाही म्हणून अपिलार्थीस उत्तरपत्रिका पाहण्यासाठी दिल्या व प्रत्येक प्रश्नाला किती गुण दिले त्याची माहिती अपिलार्थीने लिहून घेतली आहे व त्यांचे समाधान झाले आहे. तथापि पाल्याच्या उत्तरपत्रिका इंग्रजीत असल्यामुळे त्यांना कळू शकल्या नाहीत असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. या सर्व बाबी कुलसचिव तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर निर्णय देताना त्यांच्या आदेशामध्ये नमूद केल्या आहेत व अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात आले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने उत्तरपत्रिकेच्या झेरॉक्स प्रती मिळण्याची पुन्हा विनंती केली आहे. तथापि आयोगाच्या असे दृष्टोत्पत्तीस आले आहे की, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांनी या प्रकरणात उत्तरपत्रिका अपिलार्थीस दाखविण्यापर्यंत कार्यवाही केलेली आहे. त्यामुळे आयोगास आता उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स प्रती देण्याची आवश्यकता दिसत नाही. तथापि अपिलार्थी यांना इंग्रजी समजत नाही असे आयोगापुढे त्यांनी म्हणणे मांडले याकरिता अपिलार्थी पुन्हा एकदा त्यांच्या पाल्याबरोबर एक विशेष बाब म्हणून उत्तरपत्रिका पुन्हा पाहू शकतील असे आयोगाचे मत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या पाल्याबरोबर वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या पाल्याची उपरोक्त उत्तरपत्रिका पुन्हा एकदा विनामूल्य बघण्याची एक संधी आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत द्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गोविंद रावसाहेब पवार, रा. मु. पो. अंमळनेर, तालुका पाटोदा, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (परिक्षा), मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नारायण भानुदास लोणकर,<br>रा. माऊली निवास, विद्यानगर (पश्चिम), बीड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नगर रचनाकार, नगर परिषद, बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद, बीड - श्री. शिवणे सतिश कृष्णाराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड - प्रतिनिधी - श्री. शिवणे सतिश कृष्णाराव, नगर रचनाकार, नगर परिषद, बीड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जावर त्यांनी प्रथम त्यांना दिनांक २६-१०-२००९ रोजी माहिती दिली आहे व तदनंतर दिनांक ०७-१२-२००९ रोजी माहिती दिलेली आहे.

अपिलार्थी आज रोजी सुनावणीस उपस्थित नाहीत. तथापि त्यांचे दिनांक २९-०७-२०१० रोजीचे राज्य माहिती आयोगास लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती प्राप्त झाली असून माहिती संदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही त्यामुळे विचाराधीन अपील रद्द करण्यात यावे. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-१२-२०१०** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नारायण भानुदास लोणकर, रा. माऊली निवास, विद्यानगर (पश्चिम), बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणेश साहेबराव लांडगे, : अपीलकर्ता
पंचशिलनगर (मंजरथ रोड), माजलगाव, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, माजलगाव,
जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी, :
उपविभागीय कृषि अधिकारी, उप विभागीय कृषि कार्यालय,
माजलगाव, जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तंत्र अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, माजलगाव, जिल्हा बीड - श्री. पी. सी. देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, माजलगाव, जिल्हा बीड - श्री. राजेंद्र निकम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १७-०४-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात सुनावणीच्या वेळी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असल्याकारणाने त्यांच्याकडून घेण्यात यावी असे अपिलार्थीस दिनांक १७-०४-२००९ रोजी कळविले होते. त्याप्रमाणे दिनांक ११-०५-२००९ रोजी तालुका कृषि अधिकारी, माजलगाव, धारुर, वडवणी व गेवराई यांना कळवून अपिलार्थीस माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले. दरम्यानच्या काळात संबंधित तालुका कृषि अधिका-यांकडून माहिती प्राप्त करुन घेऊन दिनांक ०१-०६-२००९ रोजी अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आली.

अपिलार्थी यांना दिनांक ११-१२-२०१० रोजी माहिती मिळाली असे त्यांनी त्यांच्या दिनांक ११-१२-२०१० रोजीच्या उप विभागीय कृषि अधिकारी, माजलगांव यांना लिहिलेल्या पत्रामध्ये नमूद केले आहे. आज रोजी अपिलार्थी उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि त्यांच्या दिनांक ११-१२-२०१० रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी असेही नमूद केले आहे की, त्यांना माहिती मिळाली असून त्यांची कोठलीही तक्रार राहिलेली नाही व संबंधित अपील निकाली काढावे. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-१२-२०१०** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश साहेबराव लांडगे, पंचशिलनगर (मंजरथ रोड), माजलगाव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा तंत्र अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय,

माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जितेंद्र मदनसिंग चौव्हाण, : अपीलकर्ता
रा. हिरालाल चौक, राजपूत गल्ली, बीड,
तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रादेशिक व्यवस्थापक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सिडको,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
प्रादेशिक व्यवस्थापक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सिडको,
औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७०३

२ सुनावणीची तारीख दि. १६-१२-२०१०

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. जितेंद्र मदनसिंग चौव्हाण : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, : उपस्थित
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सिडको,
औरंगाबाद - श्री. व्ही. व्ही. कुलकर्णी

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, : उपस्थित
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सिडको,
औरंगाबाद - श्री. आर. एम. पवनीकर

३.४ त्रयस्थ पक्ष - श्री. ए.डी. मोताळे : उपस्थित

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०१-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०६-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी त्यांचे वकिलासह, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष सर्वजण उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, त्यांनी नुकताच कार्यभार घेतला आहे. त्यांनी या प्रकरणात आयोगास सांगितले की, श्री. ए. डी. मोताळे यांची संपूर्ण चौकशी करण्यात आलेली असून ते दोषी नाहीत असा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे व तसे त्यांनी अपिलार्थीस कळविले आहे. अशा प्रकारे कळविणे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीशी सुसंगत नाही. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०७-२००९ रोजीच्या अर्जान्वये नोव्हेंबर २००८ चा त्यांनी केलेला तक्रार अर्ज व या अर्जावर चौकशीच्या केलेल्या संपूर्ण कार्यवाहीचा तपशील, आदेश, सूचना इत्यादींच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार, चौकशीची प्रक्रिया आता पूर्ण झाली असल्याकारणाने, अपिलार्थीने नोव्हेंबर २००८ रोजी केलेल्या अर्जानंतर चौकशी प्रक्रियेत ज्या काही कागदपत्रांची निर्मिती झाली आहे अशा सर्व प्रकारच्या टिपण्या, पत्रव्यवहार अपिलार्थीस देय होत आहे. त्याप्रमाणे माहिती देण्यात यावी. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे त्यांनी मागितलेल्या संपूर्ण माहितीच्या छायांकित प्रती साक्षांकीत करुन अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जितेंद्र मदनसिंग चौव्हाण, रा. हिरालाल चौक, राजपूत गल्ली, बीड, तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. काझी रऊफोद्दीन पिता हिसामोद्दीन, : अपीलकर्ता
रा. ग्रामसेवक कॉलनी, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक धर्मादाय आयुक्त, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. काझी रऊफोद्दीन पिता हिसामोद्दीन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बीड - श्री. जी. जी. सुर्यवंशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - हजरत बालेपिर अरबी मदरसा | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३०-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी कबूल केले की, अपिलार्थीस ते माहिती पुरवू शकले नाहीत. याची कारणमीमांसा करताना त्यांनी सांगितले की, त्यांच्या कार्यालयात अपुरा कर्मचारीवर्ग आहे, पदे रिक्त आहेत व कामाचा व्याप जास्त आहे. जन माहिती अधिकारी यांची ही बाब आयोगास मान्य करता येत नाही. माहिती अधिकार अधिनियमाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिका-याने असेही सांगितले की, संबंधित ट्रस्टकडून काहीही माहिती त्यांच्याकडे प्राप्त होत नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब होतो.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, त्यांनी मागितलेल्या सात मुद्दयांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असायला हवी व ती त्यांना मिळायला पाहिजे.

अपिलार्थीने माहिती मागताना काही प्रश्नवजा माहिती मागितली आहे. या माहितीचे सुलभीकरण जन माहिती अधिका-याने करावे व सर्व मुद्दयांवरील त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल असे आयोगाने जन माहिती अधिका-यास सांगितले व जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही त्याबाबत अपिलार्थीस तसे कळविण्यात यावे.

वरील पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १६-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. काझी रऊफोद्दीन पिता हिसामोद्दीन, रा. ग्रामसेवक कॉलनी, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. माणिकराव माधवराव मुलगीर, : अपीलकर्ता
व्दारा - बी-५, पोलीस क्वार्टर,
परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
समाजकल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद,
परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. माणिकराव माधवराव मुलगीर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, समाजकल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, परभणी - श्री. एस. ई. गोजगोडवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १७-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली १५७ पानांची माहिती त्यांना दिनांक १७-१२-२००९ रोजी कुरियरने पाठविली होती तथापि अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांना ही माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी यापुढे माहिती नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस पाठवावी म्हणजे अपिलार्थीस निश्चितपणे ती मिळेल याची खात्री राहील. अपिलार्थीने दिनांक ३०-०९-२००९ रोजी प्रथम अपील केले. त्यावर जन अपिलीय अधिका-याने सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून आले नाही ही बाब गंभीर आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-याने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचा एक संच आयोगास सादर केला. आयोगाने या संचाच्या झेरॉक्स काढून आज आयोगाचे कामकाज संपण्यापूर्वी तो अपिलार्थीस द्यावा असे निर्देश दिले. माहितीचा विषय मतीमंद मुलांच्या शिक्षणाबाबतचा आहे त्यामुळे अशी माहिती देण्यास प्राधान्य देणे आवश्यक होते. तथापि असे घडलेले आढळून येत नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी याबाबत लक्ष देणे आवश्यक आहे. माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल व अपिलार्थीने मागितलेली माहिती विहित मुदतीत मिळेल याकरिता दक्ष राहण्यासाठी सर्व अधिका-यांना परिपत्रकाव्दारे आदेशित करावे असे आयोगाचे निर्देश आहेत.

वर ठरल्यानुसार आयोगासमोर माहितीचे हस्तांतरण झाले. अपिलार्थीने माहिती स्विकारली. अपिलार्थीने प्राप्त माहितीची तपासणी करुन त्यामध्ये त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती प्राप्त झाली नसल्यास तसे जन माहिती अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत कळवावे. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस पुढील १५ दिवसाच्या आत पुरवावी, असे निर्देश आयोगाने दिले आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. माणिकराव माधवराव मुलगीर, व्दारा - बी-५, पोलीस क्वार्टर, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, समाजकल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीकांत लक्ष्मणराव वाईकर, : अपीलकर्ता
जिंतूर कॉलनी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी - सौ. दिक्षीत ए. एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, त्यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व त्यांचे प्रतिनिधी यांनी आयोगापुढे प्रस्तुत व्दितीय अपिलाबाबतची सद्यस्थिती सादर केली. त्यानुसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिनांक १३-०१-२०१० रोजी संबंधित विभागाकडून प्राप्त झाल्यावर देण्यात आली. दरम्यानच्या काळात अपिलार्थीने दिनांक ०१-१०-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक २८-१०-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती पुरविण्यात यावी असे आदेश प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केले. तरीही अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झालेला आहे असे आयोगाच्या नजरेस आले आहे. अशा प्रकारचा विलंब यापुढे होणार नाही यासाठी नगरपरिषद कार्यालय, सेलू येथील सर्व अधिकारी / कर्मचा-यांनी दक्षता घेणे आवश्यक आहे या बाबतचे परिपत्रक मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू यांनी निर्गमीत करावे. अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती दिनांक १३-०१-२०१० रोजी प्राप्त झाली आहे. याबाबतची त्याची पोच मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू यांच्या दप्तरी आहे त्याची एक प्रत आज रोजी आयोगास सादर करण्यात आली. अपिलार्थी आज रोजी सुनावणीस उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास अवगत झाली नाही तथापि वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात यावे या निर्णयाप्रत आयोग आला आहे. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीकांत लक्ष्मणराव वाईकर, जिंतूर कॉलनी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा

परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लक्ष्मण मारोती करंजकर, : अपीलकर्ता
५५, प्रशांत, आनंदनगर, वसमत रोड, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप प्रबंधक (आस्था), मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
प्रबंधक, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. लक्ष्मण मारोती करंजकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (आस्था), मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी - श्री. रविंद्र विश्वनाथराव जुकटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी - प्रतिनिधी - श्री. भगवान माणिकराव गोरे, उप कुलसचिव (परीक्षा) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४.१०.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी हे आजच्या सुनावणीसाठी उपस्थित राहू शकत नाही असे त्यांनी आयोगास पत्र दिले आहे.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, मा. लोक आयुक्तांच्या दिनांक ०७-०७-२००९ च्या पत्रान्वये त्यावेळची सद्यस्थिती दिनांक १४-१०-२००९ रोजी अपिलार्थीस कळविण्यात आली आहे आणि चौकशी प्रक्रिया प्रगतीपथावर होती. आता चौकशी प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ची माहिती मिळाली पाहिजे अशी भूमिका आयोगासमोर अवगत केली. तीच भूमिका आयोग मान्य करीत आहे. आता चौकशी प्रक्रिया पूर्ण झाली असल्याकारणाने मा. लोक आयुक्त यांच्या दिनांक ०७-०७-२००९ च्या पत्रान्वये या प्रकरणात जो अंतिम अहवाल मा. लोक आयुक्तांना सादर केला आहे त्याची एक साक्षांकीत प्रमाणित प्रत अपिलार्थीस देण्यात यावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे मा. लोक आयुक्त यांच्या दिनांक ०७-०७-२००९ च्या पत्रान्वये जो अंतीम अहवाल मा. लोक आयुक्तांना सादर केलेला आहे त्या अंतीम अहवालाची एक साक्षांकीत प्रमाणित प्रत अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने देण्यात यावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण मारोती करंजकर, ५५, प्रशांत, आनंदनगर, वसमत रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (आस्था), मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पवार मारोती दत्तराव, : अपीलकर्ता
रा. वझूर, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी / ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,
वझूर, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, पूर्णा,
तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पवार मारोती दत्तराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वझूर, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी - श्री. के. आर. जवंजाळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी - श्री. के. डी. वाटेगांवकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, दिनांक २५-०९-२००९ रोजी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना व्यक्तिशः देण्याचा प्रयत्न करण्यात आला. तथापि अपिलार्थी यांनी या माहितीचा स्वीकार केला नाही यावर पंचनामा करण्यात आलेला आहे व जन माहिती अधिकारी यांनी या पंचनाम्याची प्रत आयोगास सादर केली आहे. यानंतर दिनांक १४-०७-२०१० रोजी पुन्हा पोस्टाने अपिलार्थीस १८९ पृष्ठांची माहिती विनामूल्य पाठविण्यात आली.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, त्यांना व्यक्तिशः माहिती प्राप्त झाली नाही तथापि पोस्टाने पाठविलेली माहिती प्राप्त झाली आहे मात्र त्यांनी मागितलेल्या माहितीतील जमाखर्च याच्या साक्षांकीत प्रती मिळाल्या नाहीत.

आज रोजी आयोगासमोर जन माहिती अधिका-याने जमाखर्चाच्या प्रतीचा एक संच अपिलार्थीस दिला तो अपिलार्थीने स्वीकारला. आयोगाने यावर अपिलार्थीस असे निर्देश दिले की, अपिलार्थी यांनी त्यांना मिळालेली माहिती पहावी व त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी जर काही माहिती मिळणे बाकी असल्यास तसे सात दिवसाच्या आत जन माहिती अधिका-यास कळवावे म्हणजे जन माहिती अधिकारी उर्वरीत माहिती या अर्जाच्या मर्यादेत राहून एका महिन्याच्या आत देतील. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पवार मारोती दत्तराव, रा. वझूर, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वझूर, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख मंजुर शेख चाँद,<br>व्दारा- श्री. शेख वाहेद,<br>फुलेनगर, केज, तालुका केज, जिल्हा बीड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी - प्रतिनिधी - श्री. शेख सिराज शेख खैसर, कनिष्ठ सहायक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी - प्रतिनिधी - श्री. खोतकर आर. जी., कार्यालय अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - कामेल उर्दू एज्युकेशन सोसायटी संचलित कामेल उर्दू प्राथमिक शाळा, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १३-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा प्रतिनिधी पाठविला आहे व त्याकरिता आयोगास त्यांच्या अनुपस्थितीबाबत पत्राने अवगत केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी प्रतिनिधी पाठविताना त्याबाबतचे विनंतीवजा पत्र आयोगास पाठविण्याची तसदी घेतलेली नाही, ही बाब योग्य नाही. भविष्यात असे घडणार नाही असे जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी श्री. कुलकर्णी यांनी बघावे असे आयोगाने आज रोजी सुनावणीच्या वेळी निर्देश दिले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती (एकूण १०४ पृष्ठे) अपिलार्थीस दिनांक २९-०७-२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे त्यांनी आयोगाच्या असेही नजरेस आणून दिले की, दिनांक २२-१२-२००९ रोजीही अपिलार्थीस माहिती पुरविण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि त्यांना माहिती जन माहिती अधिकारी यांनी दोनदा पाठविल्याचे दिसत आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीचा एक संच जन माहिती अधिका-याने आयोगास दाखविला.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख मंजुर शेख चाँद, व्दारा- श्री. शेख वाहेद, फुलेनगर, केज, तालुका केज, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मुळे अशोक माणिकराव,<br>मु. हिवरा (खु.), पो. सोमनाथ बोरगांव, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, केज, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>तहसील कार्यालय, केज, जिल्हा बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, केज, जिल्हा बीड<br>- श्री. पुरी पुरुषोत्तम ज्ञानपुरी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, जिल्हा बीड - श्री. पुरी पुरुषोत्तम ज्ञानपुरी | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. हरिभाऊ करडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०४-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागणी केलेली श्री. हरिभाऊ करडे व हिवरा (खु.) येथील माहिती अंबाजोगाई येथून तहसीलदार, अंबाजोगाई यांच्यामार्फत उपलब्ध होऊ शकते असे दिनांक १२-०१-२००९ रोजी अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. तथापि तहसीलदार, केज यांनी याऐवजी अपिलार्थीचा अर्ज तहसीलदार, अंबाजोगाई यांच्याकडे पाठविणे आवश्यक होते. अपिलार्थी आज रोजी गैरहजर आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. अपिलार्थीचे दिनांक १३-१२-२०१० रोजीचे राज्य माहिती आयोगास लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे व त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, श्री. हरिभाऊ करडे यांची माहिती मिळाली असून हिवरा (खु.) येथील माहिती मिळाली नाही. त्याचप्रमाणे तहसीलदार, केज यांना अपिलार्थीने दिनांक १८-१२-२०१० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे की, त्यांना विचाराधीन दोनही माहितीची आवश्यकता नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडील सदरहू व्दितीय अपील ते अपील अर्जासह मागे घेत आहेत. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-याने अपिलार्थीचे हे पत्र आयोगास सादर केले. प्रस्तुत दोनही दुकाने ही अंबाजोगाई तालुक्यात असल्यामुळे अपिलार्थी तहसीलदार, अंबाजोगाई यांच्याकडे पुन्हा माहिती मागू शकतात. या पार्श्वभूमीवर व अपिलार्थीने सादर केलेल्या पत्रावरुन अपील निकाली काढण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत झाले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-१२-२०१०** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुळे अशोक माणिकराव, मु. हिवरा (खु.), पो. सोमनाथ बोरगांव, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. काळे नवनाथ रोहिदास, | : | अपीलकर्ता |
| मु. केसापुरी, पो. परभणी, तालुका जिल्हा बीड | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बीड - श्री. रामेश्वर वसंतराव गोरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड - प्रतिनिधी - श्री. रामेश्वर वसंतराव गोरे, नायब तहसीलदार (पुरवठा) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-१०-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-११-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-११-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२-१२-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०३-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आणि जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने दिनांक १७-१०-२००८ रोजी मागणी केलेल्या मुद्दयावरील माहिती तत्कालीन जन माहिती अधिका-याने दिनांक ०७-११-२००८ रोजी दिली आहे. तथापि मिळालेल्या माहितीवर समाधान न झाल्यामुळे अपिलार्थीने दिनांक २१-११-२००८ रोजी तहसीलदार, बीड तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. यावर तहसीलदार, बीड तथा जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-१२-२००८ रोजी सुनावणी घेऊन आदेश दिले आहेत की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती स्वस्त धान्य दुकान मौजे केसापुरी, जिल्हा बीड यांच्याकडून घेण्यात यावी. त्याप्रमाणे माहिती घेऊन ती अपिलार्थीस पुरविण्याची जबाबदारी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बीड यांची होती. मात्र आजपर्यंत ही माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली नाही याची आयोगाने गांभीर्याने दखल घेतलेली आहे. सध्याचे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बीड यांनी काही महिन्यापूर्वीच या पदाचा कार्यभार हाती घेतला आहे. आज रोजी त्यांनी आयोगास सांगितले की, एका महिन्याच्या आत सदरची माहिती प्राप्त करुन घेऊन ते अपिलार्थीस देतील.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एम. एन. चव्हाण सेवानिवृत्त झाले आहेत. तथापि माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदींचा व नियमांचा त्यांच्याकडून भंग झालेला आहे व ही घटना सन २००८-१० या कालावधीची आहे त्यामुळे त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणे आवश्यक आहे असे आयोगाचे मत आहे व त्याकरिता विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बीड श्री. एम. एन. चव्हाण यांच्याविरुध्द त्वरीत शिस्तभंगविषयक कारवाईची प्रक्रिया सुरु करणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बीड श्री. एम. एन. चव्हाण यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक यथोचित कार्यवाही त्वरीत हाती घ्यावी, अशी आयोगाची शिफारस आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. काळे नवनाथ रोहिदास, मु. केसापुरी, पो. परभणी, तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामचंद्र दिनकर रत्नपारखी, : अपीलकर्ता
रत्नकुंज निवास, जवाहर कॉलनी, नगर रोड, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, सहकार आयुक्त व निबंधक, : उत्तरवादी
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३३९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी, अपर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०१-०२-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०६-०३-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५-१०-२००७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-०१-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०१-०२-२००७ रोजी केलेल्या माहिती अर्जावर त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम १०१ अन्वये उपलब्ध माहिती दिनांक २४-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविली आहे. तथापि अपिलार्थी यांनी दिनांक २१-०६-२००७ रोजी प्राप्त झालेली माहिती वाचण्याजोगी नसल्याचे कळविले होते. यावर अपिलार्थी यांना दिनांक २४-०५-२००७ अन्वये विनामूल्य पुरविण्यात आलेल्या माहितीसह अपर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयात समक्ष उपस्थित राहून शंकाचे समाधान करुन घेण्याचे सूचित करण्यात आले होते असे कागदपत्रावरुन दिसत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिनांक २४-१०-२००७ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना पुरविण्यात आलेली आहे असा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले आहे.या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-१२-२०१०** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामचंद्र दिनकर रत्नपारखी, रत्नकुंज निवास, जवाहर कॉलनी, नगर रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मिलींद वसंतराव विटेकर, : अपीलकर्ता
विटेकर निवास, ब्राम्हण गल्ली, सोनपेठ,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय (सामान्य प्रशासन विभाग),
परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी - प्रतिनिधी - श्री. साळवे पंढरीनाथ सोमाजी, अव्वल कारकून | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी - प्रतिनिधी - श्री. साळवे पंढरीनाथ सोमाजी, अव्वल कारकून | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०४-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०६-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२-०८-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०९-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांनी श्री. साळवे पंढरीनाथ सोमाजी, अव्वल कारकून, गृह शाखा यांना सुनावणीसाठी पाठविण्यात येत आहे असे आयोगास कळविले आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांनीही श्री. साळवे पंढरीनाथ सोमाजी, अव्वल कारकून, गृह शाखा यांना सुनावणीसाठी पाठविण्यात येत असल्याचे आयोगास कळविले आहे.

आयोगासमोर उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीस दिनांक १२-०७-२०१० रोजी माहिती (३७ पृष्ठे व एक सीडी) विनामूल्य देण्यात आली आहे. अपिलार्थीने ती स्वीकारली आहे व त्याबाबतची दिनांक १५-०७-२०१० रोजीची पोच जन माहिती अधिका-यास दिली आहे असे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आज रोजी आयोगासमोर सांगितले.

प्रस्तुत माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांच्याकडून सुमारे दोन वर्षाचा विलंब झालेला आहे. जिल्हाधिकारी, परभणी यांनी याबाबत कारणमीमांसेचा शोध घेऊन यापुढे विलंब होणार नाही याबाबत दक्ष राहण्याबाबत सर्व अधिकारी / कर्मचारी यांना सूचना देण्यात याव्यात.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित नाहीत तथापि वरील पार्श्वभूमीवर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मिलींद वसंतराव विटेकर, विटेकर निवास, ब्राम्हण गल्ली, सोनपेठ, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. घाटुळे जगन खंडू, : अपीलकर्ता
मु. पो. जवळगांव, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद (प्रा.), तालुका जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद (प्रा.), तालुका जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/१८३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड - श्री. सुखदेव सानप | : | उपस्थित |
| ३.४ | श्री. काटवटे आर. व्ही., नेताजी सुभाषचंद्र विद्यालय, प्रा. वि. अंबाजोगाई | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेल्या तीन मुद्दयांवरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक ३ ची माहिती त्यांना दिनांक ०७.०८-२०१० रोजी पाठविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मुद्दा क्रमांक १ व २ ची माहिती त्रयस्थ पक्षाने परस्पर दिलेली आहे. दिनांक १०-१२-२०१० रोजी याबाबतची माहिती राज्य माहिती आयोगाला दिलेली आहे. तसेच अपिलार्थीने समदिनांकाच्या दुस-या एका पत्राव्दारे आयोगास कळविले आहे की, त्यांना प्रस्तुत व्दितीय अपिलासंदर्भातील सर्व माहिती मिळाली आहे. आज रोजी अपिलार्थी उपस्थित नाहीत. तथापि वरील पार्श्वभूमीवर अपील निकाली काढण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत आहे. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. घाटुळे जगन खंडू, मु. पो. जवळगांव, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. हरिभाऊ विश्वनाथ कुरे,<br>रा. पुनंदगाव, पोस्ट तालुका माजलगाव, जिल्हा बीड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पुनंदगाव, पोस्ट तालुका माजलगाव, जिल्हा बीड - श्री. स्वामी एम. जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड - श्री. गायकवाड आर. व्ही. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६-०५-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक ०७-०७-२००९ रोजी दिली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यामुळे या प्रकरणात अपिलार्थीचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरीम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हरिभाऊ विश्वनाथ कुरे, रा. पुनंदगाव, पोस्ट तालुका माजलगाव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पुनंदगाव, पोस्ट तालुका माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव,

जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संदीपान आप्पाराव थोरात, : अपीलकर्ता
व्दारा- मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड, किल्ले धारुर,
जिल्हा बीड-४३११२४

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, बीड - श्री. मिर्झा रहिम बेग | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड - श्री. विजय जी. घनवट | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-०६-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक १२-०६-२००९ रोजी पाठविण्यात आली आहे. तथापि या माहितीवरुन आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीस त्रोटक स्वरुपाची खुलासेवजा माहिती पाठविली आहे व माहितीच्या सत्यप्रती पुरविण्यात आलेल्या नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, अपिलार्थीस त्यांनी माहिती पैसे भरुन घेऊन जा असे कळविले होते. तथापि आयोगाच्या असेही निदर्शनास आले आहे की, जन माहिती अधिका-याने कोणती माहिती तयार आहे, किती पृष्ठे आहेत व यासाठी किती खर्च येणार आहे हा तपशील अपिलार्थीस कळविलेला नाही. प्रकरण जुने आहे व आजपर्यंत जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे नीट वाचन न करता माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला आहे असे आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदींचे व नियमांचे पालन त्यांच्या हातून झाले नाही असे आयोगाचे मत झाले आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावणे आवश्यक ठरत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सुनावणीच्या वेळी असेही सांगितले की, सर्व माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे व ती माहिती आता त्यांना अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

या प्रकरणात जन माहिती अधिका-याकडून माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदींचा व नियमांचे पालन करण्यात कसूर झाला आहे व त्यांच्याकडून अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी विलंब झालेला आहे याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी यांना रुपये २५,००० रुपये इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत आयोगास सादर करावा.

या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड श्री. डी. वाय. सपकाळ हे होते. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी त्यांनी सुध्दा या प्रकरणात गांभीर्याने लक्ष दिले नाही व प्रथम अपिलावर निर्णय देताना सर्व बाबींचा विचार केला नाही. अशी प्रकरणे भविष्यात घडू नये याकरिता जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांनी त्यांच्या स्तरावर सर्व प्रथम अपिलीय अधिकारी यांना एक आदेशवजा परिपत्रक निर्गमीत करावे असे आयोगाचे मत आहे. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या सर्व मुद्दयावरील माहितीच्या झेरॉक्स प्रती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवाव्यात.

२. या प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमा-मधील तरतुदींचे व नियमांचे पालन करण्यात कसूर झाली आहे व त्यांच्याकडून माहिती

पुरविण्यासाठी विलंब झालेला आहे याकरिता त्यांच्यावर रुपये २५,००० रुपये शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत आयोगास सादर करावा.

३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांनी वर नमूद केल्याप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमामधील अपील प्रकरणे अधिनियमातील तरतुदीनुसार पध्दतशीर हाताळली जातील याकडे लक्ष देण्यासाठी सर्व प्रथम अपिलीय अधिकारी यांना आदेशवजा परिपत्रक निर्गमीत करावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संदिपान आप्पाराव थोरात, व्दारा- मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड, किल्ले धारुर, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवनासमोर, साधुवासवाणी, चौक, रेल्वेस्टेशन जवळ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रामकिसन आण्णाराव वाकडे,<br>पाटबंधारे वसाहत, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| २ | श्री. बाबु लक्ष्मण संताईकर,<br>पाटबंधारे वसाहत, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड - प्रतिनिधी - श्री. एस. एस. हाशमी, सहायक अधीक्षक अभियंता | : | उपस्थित |
| ३.४ | कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली - श्री. मो. जमील मो. उस्मान | : | उपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष श्री. यल्ललवाड, उप कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर (सेवानिवृत्त) | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २३-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोनही अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी सर्व उपस्थितांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीच्या दिनांक ११-०८-२००९ रोजीच्या माहिती अर्जावर दिनांक २४-०८-२००९ ला आवश्यक ते शुल्क भरण्याकरिता अपिलार्थीस कळविण्यात आले. त्यानुसार दिनांक ०४-०९-२००९ ला अपिलार्थीने शुल्काचा भरणा केला व दिनांक ०७-०९-२००९ रोजी नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस पुरविण्यात आली व ती त्यांना प्राप्त झाली आहे असे आयोगास आढळून आले. त्यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-१२-२००९ रोजी सुनावणी घेतली व जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे, परंतु पुन्हा अपिलार्थीस विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन द्यावी, अशी त्यांच्या निर्णयात नोंद आहे. यावर अपिलार्थीचे समाधान झाले आहे असेही त्यांनी नमूद केले आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-१२-२०१०** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामकिसन आण्णाराव वाकडे, पाटबंधारे वसाहत, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. श्री. बाबु लक्ष्मण संताईकर, पाटबंधारे वसाहत, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

३. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपीलकर्ता
शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मधुकर हिराजी मुळ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत ही बाब गंभीर आहे याची नोंद आयोगाने घेतली आहे. यापुढे भविष्यात आयोगाकडील सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत त्यांनी दक्षता घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास सांगितले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्रमांक १, २, ३ व ४ या मुद्दयांची माहिती मिळालेली आहे. मात्र मुद्दा क्रमांक ५ ची माहिती मिळालेली नाही.

अपिलार्थीने मागितलेली सदरची माहिती जन माहिती अधिका-याने कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस देणे आवश्यक आहे जी त्यांना तात्काळ देण्याची व्यवस्था करावी. अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी मागणी केलेली मुद्दा क्रमांक ५ ची माहिती त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अनिल वामनराव चव्हाण,<br>शिवाजीनगर, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी (महसूल), सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अनिल वामनराव चव्हाण | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी - श्री. अरविंद नरसीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी (महसूल), सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी - डॉ. श्री. प्रताप काळे | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. जावेद उर्फ शेख अ. सत्तार | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०४-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-०६-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आज रोजी सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, मानवत यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने केलेल्या अर्जावर त्यांनी मागितलेली माहिती त्यांना पुरविता आली नाही याचे कारण असे की, संबंधित कागदपत्रे सांभाळण्याची जबाबदारी ही नायब तहसीलदार यांची असते व या प्रकरणात नायब तहसीलदार यांनीच प्रश्नाधीन प्रमाणपत्र निर्गमीत केले आहे. जन माहिती अधिका-याने पुढे आयोगास असेही सांगितले की, संबंधित नायब तहसीलदार यांच्याकडे याबाबत विचारणा केली असता त्यांनी ही नस्ती त्रयस्थ पक्ष श्री. जावेद उर्फ शेख अ. सत्तार यांच्या हातात सुपुर्द केली आहे, असे कळविले आहे. ही बाब आयोगास गंभीर वाटते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी संबंधित संचिका किंवा कागदपत्रे तहसील कार्यालयात उपलब्ध नाहीत असे आयोगास सांगितले. तसे अपिलार्थीस त्यांना आता कळवावे लागेल, अपिलार्थीने आज रोजी त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, त्यांना सदर माहिती ही इतर प्रकरणामध्ये योग्य प्रकारे अर्ज करण्याकरिता पाहिजे होती.

अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज दिनांक १८-०३-२००९ चा आहे. माहिती दि. १८.०८.२००८ ची आहे. या कालावधीत या प्रकरणामध्ये संबंधित तत्कालीन नायब तहसीलदार, मानवत जे या प्रकरणात सहायक जन माहिती अधिकारी किंवा Deemed जन माहिती अधिकारी होतात ते त्याचवेळी ही माहिती देऊ शकले असते. तसेच नायब तहसीलदार यांनी अर्जदाराकडे कार्यालयीन कागदपत्रे हस्तांतरीत करणे ही बाब अत्यंत गंभीर आहे. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी याकरिता या प्रकरणात सखोल चौकशी करणे आवश्यक आहे व ही चौकशीची प्रक्रिया प्रगतीपथावर असताना संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, मानवत यांना निलंबीत करण्याचा निर्णय आवश्यकतेनुसार विभागीय आयुक्तांना घ्यावा लागेल. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भातील कागदपत्रांची सद्यस्थिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने कळवावी.

२. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी संबंधित नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मानवत, जिल्हा परभणी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रक्रिया सुरु करावी व आवश्यकता असल्यास चौकशी प्रक्रीयेत बाधा येऊ नये म्हणून संबंधितास

निलंबीत करण्याचा निर्णय घ्यावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनिल वामनराव चव्हाण, शिवाजीनगर, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे (पाथरीकर),<br>मु. पो. पाथरी (इंदिरानगर), तालुका पाथरी, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे (पाथरीकर) | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी<br>- श्रीमती के. पी. कांबळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, परभणी - प्रतिनिधी - श्री. ठाकूर बी. एस., विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. प्रल्हाद काळे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७-११-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३०-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना दिनांक ३१-०८-२००९ रोजी पुरविण्यात आलेली आहे. अपिलार्थीने ही बाब मान्य केली तथापि अपिलार्थीने या माहितीत सेवापुस्तिकेमधील संबंधित पृष्ठाच्या साक्षांकीत प्रती मागितल्या आहेत व त्या त्यांना मिळाल्या नाहीत, असे त्यांनी आयोगास सांगितले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सेवापुस्तिका उपलब्ध आहे त्याप्रमाणे आवश्यक पृष्ठाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे उपलब्ध केल्या. त्या अपिलार्थीस आयोगासमोर देण्यात आल्यात. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या दुस-या मुद्दयाबाबत माहिती देताना, त्यावेळी कारवाई केलेली नाही असे नमूद केलेले होते ती परिस्थिती त्या वेळेची होती असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. आता जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, संबधितांस (श्री. काळे) निलंबीत करण्यात आले आहे व याबाबतची नोंद त्यांच्या सेवापुस्तिकेत घेतली आहे व त्याची प्रत आज रोजी आयोगासमोर सादर करण्यात आली व ती अपिलार्थीस देण्यात आली.अपिलार्थीने ती स्वीकारली.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे (पाथरीकर), मु. पो. पाथरी (इंदिरानगर), तालुका

पाथरी, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सारडा सत्यनारायण गंगाबिशनजी,<br>क्रांती चौक, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>स्थानक प्रमुख / आगार प्रमुख, एस. टी. आगार, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>एस. टी. आगार, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, पाथरी आगार, तालुका पाथरी, जिल्हा परभणी<br>- श्री. संदीप शरदराव रायलवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, एस. टी. डेपो, कार्यालय, गंगाखेड रोड, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत तसेच त्यांचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाहीत याची नोंद आयोगाने घेतली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी भविष्यात सुनावणीला आयोगासमोर उपस्थित राहतील याची दक्षता घेणे आवश्यक आहे. अपिलार्थी आज रोजी अनुपस्थित आहेत. प्रकृती अस्वस्थतेमुळे ते सुनावणीसाठी येऊ शकत नाहीत असे त्यांनी आयोगास कळविले आहे.

अपिलार्थीच्या व्दितीय अपिलावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकाऱ्याने त्यांना पाठविलेली माहिती मागितलेल्या माहितीशी सुसंगत नाही. दिनांक २९-०९-२००९ रोजीच्या अर्जान्वये अपिलार्थीने मागितलेल्या माहितीवर त्यांना माहिती दिली ही बाब सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी आयोगास दाखवू शकले नाहीत. या प्रकरणात अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी विलंब झालेला आहे. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, एस. टी. डेपो, परभणी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती स्वत: संकलीत करावी व खास माहितगार दुतामार्फत अपिलार्थीस नेऊन देण्याची व्यवस्था करावी, म्हणजे अपिलार्थीचे मागितलेल्या माहितीबाबत शंकानिरसन जागीच होऊ शकेल. अपिलार्थी हे कठीण रोगाचे रुग्ण आहेत असे आयोगास कळविण्यात आले आहे. यामुळे प्रथम अपिलीय अधिका-याने ही कारवाई करणे आयोगास उचित वाटते.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपिलार्थीने मागितलेली माहिती जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, एस. टी. डेपो, परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एकत्र करुन ती खास दुतामार्फत आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस पुरविण्याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-१२-२०१०** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सारडा सत्यनारायण गंगाबिशनजी, क्रांती चौक, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, पाथरी आगार, तालुका पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, एस. टी. डेपो, कार्यालय, गंगाखेड रोड, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिनबंधु सुदामराव हत्तिअंबीरे, : अपीलकर्ता
म. फुलेनगर, गंगाखेड, तालुका गंगाखेड,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगाखेड,
तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी - श्री. पाटील वसंत गणेशराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी - प्रतिनिधी - श्री. सोनवणे बाबाराव भागुजी, उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२-०६-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीस दिनांक २२-०६-२००९ रोजी कळविण्यात आले होते की, अपिलार्थीने दिनांक २८-०५-२००९ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती फार मोठ्या कालावधीची व विस्तृत स्वरुपाची आहे त्यामुळे आपणास नेमके कोणत्या कामाची माहिती पाहिजे त्याचा तपशील द्यावा म्हणजे माहिती देणे सुलभ होईल. यावर अपिलार्थीने दिनांक ०८-०७-२००९ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे पाच मुद्दे नमूद करुन कळविले होते त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीच्या साक्षांकीत छायांकीत प्रती पाठविल्यात. त्या अपिलार्थीस दिनांक ०९-०८-२०१० रोजी प्राप्त झाल्यात. पोस्टाने माहिती पाठविण्यापूर्वी जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस दिनांक ०२-०८-२०१० रोजी कळविले की, उपलब्ध माहिती उपविभागात असून हस्तगत करण्यासाठी संपर्क साधावा, असे आयोगास आढळून आले आहे.

आज रोजी अपिलार्थी उपस्थित नाहीत तथापि त्यांचे दिनांक १२-०८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी, सा. बा. उपविभाग, गंगाखेड यांना लिहिलेले पत्र आयोगापुढे आहे. या पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना संपूर्ण माहिती मिळाली असून त्यांचा अर्ज दप्तरीदाखल करण्यात यावा. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिनबंधु सुदामराव हत्तिअंबीरे, म. फुलेनगर, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विठ्ठल किसन मोरे,<br>मु. कान्हेगाव, पो. पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार (गौण खनिज), तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (गौण खनिज), तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०५-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. त्यामुळे या प्रकरणात सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेणे

आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरीम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०६-०१-२०११ रोजी दुपारी ०३-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विठ्ठल किसन मोरे, मु. कान्हेगाव, पो. पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (गौण खनिज), तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शेख नईम शेख लाल,<br>नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>संचालक, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>संचालक, समाजकल्याण संचालनालय, (सा. न्याय व वि. स. वि.), महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ | : | |
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप संचालक (शिक्षण), समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ - प्रतिनिधी - श्री. वि. शा. खांडेकर, विधी अधिकारी, विभागीय समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ - श्री. पी. एस. वानखेडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९-०७-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०८-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-०८-२००८ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३१-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे त्याची नोंद प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देताना त्यांच्या निर्णयामध्ये दिनांक २६-०६-२००९ रोजी घेतलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाची प्रत अपिलार्थीस देण्यात आल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थी आज रोजी सुनावणीसाठी उपस्थित नाहीत तथापि त्यांचे दिनांक ०९-०७-२०१० चे राज्य माहिती आयोग, औरंगाबाद खंडपीठास दिलेले पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये अपिलार्थीने माहिती प्राप्त झाली आहे असे नमूद केले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख नईम शेख लाल, नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा उप संचालक (शिक्षण), समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र

राज्य, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजय रामकृष्णराव कुलकर्णी, : अपीलकर्ता
'व्दारकाई', नानलपेठ, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड - प्रतिनिधी - श्री. एस. एस. हाशमी, सहायक अधीक्षक अभियंता | : | उपस्थित |
| ३.४ | कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली - श्री. मो. जमील मो. उस्मान | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०८-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-१०-२००७ |

७	अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि. ०३-०३-२००८

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी उपस्थितांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने केलेल्या अर्जावर त्यांना दिनांक ११-०९-२००७ रोजी शुल्काचा भरणा करण्याचे कळविण्यात आले. अपिलार्थीने त्याप्रमाणे रकमेचा भरणा केल्यानंतर दिनांक २५-०९-२००७ ला माहिती दिली. त्यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांनी दिनांक २९-११-२००७ रोजी सुनावणी घेतली व दिनांक २३-११-२००७ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक माहिती उपलब्ध करुन दिली असल्याने प्रकरण खारीज करण्याचा निर्णय घेतला.

आज रोजी अपिलार्थी उपस्थित नाहीत. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय आयोगास योग्य आढळून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद**	**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक	२२-१२-२०१०**	**खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१.	श्री. संजय रामकृष्णराव कुलकर्णी, 'व्दारकाई', नानलपेठ, परभणी.

२.	जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग,

वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपीलकर्ता
शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८५२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मधुकर हिराजी मुळे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना - प्रतिनिधी - श्री. एस. बी. फुले, कृषि पर्यवेक्षक | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना - श्री. सी. के. बहुरे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८-०५-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०७-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-११-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आज रोजी सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीकरिता रुपये १३२६ इतक्या रकमेचा भरणा करावा असे त्यांना दिनांक १८-०५-२००९ रोजी कळविण्यात आले व त्याप्रमाणे अपिलार्थीने या रकमेचा भरणा मनीऑर्डरव्दारे दिनांक १२-०६-२००९ रोजी त्यांच्या कार्यालयात केलेला आहे. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती तयार आहे असे कळविले परंतु जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत.

आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस द्यावयाच्या माहितीच्या झेरॉक्स प्रतीचा संच आयोगास दाखविला व आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे तो अपिलार्थीस देण्यात आला. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती आयोगासमोर स्वीकारली. मिळालेल्या माहितीची पाहणी करुन त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी काही शिल्लक असल्यास अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती माहिती मागवू शकतात.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| | श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत,<br>'पुष्पक', दत्तनगर, जिंतूर रोड, परभणी | : अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी | : उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी (महसूल), उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८१७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी (महसूल), उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६-०६-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.तसेच त्यांनी त्यांचे प्रतिनिधीही आयोगाकडील सुनावणीसाठी पाठविलेले नाहीत ही गंभीर बाब आहे. जिल्हाधिकारी, परभणी यांनी याबाबत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघांचा खुलासा मागवून पुढील कार्यवाही योजावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, मुद्दा क्रमांक १ ची माहिती त्यांना प्राप्त झाली आहे व मुद्दा क्रमांक २ ची माहिती योग्यरित्या मिळाली नाही. एकत्रित कुटूंबात असलेली सासूच्या नावाची वडिलोपार्जित जमीन सुनेच्या नावाने करावयाची झाल्यास त्याकरिता शासनमान्य जी कार्यप्रणाली आहे त्याबाबतची त्यांना माहिती अपेक्षित आहे. म्हणून आयोगाचे निदेश आहेत की, याबाबत असलेले शासन निर्णय, परिपत्रक व आदेश इत्यादीच्या साक्षांकीत प्रती अपिलार्थीस देण्यात याव्यात.

३. मुद्दा क्रमांक ३ बाबत अपिलार्थीस सोयाबीनचे लष्करी अळीमुळे झालेल्या नुकसानीचे पाहणी करण्याचे आदेश कधी मिळाले त्याची तारीख हवी आहे. याकरिता अपिलार्थीस अशा प्राप्त झालेल्या आदेशाची साक्षांकीत प्रत देणे आवश्यक ठरत आहे.

४. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांनी दिनांक ३१-०८-२००९ रोजी त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेतली आहे. तथापि सुनावणीचे आदेश व निर्णय अपिलार्थीस पाठविण्यात आले नाही असे अपिलार्थीने सांगितले. त्याच्या प्रती अपिलार्थीस त्वरीत पाठविणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेली माहिती व त्यांना देय असलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. जिल्हाधिकारी, परभणी यांनी आयोगाच्या सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित राहिले नाहीत तसेच त्यांनी त्यांचे प्रतिनिधीही सुनावणीसाठी पाठविले नाहीत याबाबत त्यांचा खुलासा मागवून पुढील कार्यवाही योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत, 'पुष्पक', दत्तनगर, जिंतूर रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मधुकर हिराजी मुळे,<br>शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,<br>जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>बदनापूर, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>बदनापूर, जिल्हा जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मधुकर हिराजी मुळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>बदनापूर, जिल्हा जालना - श्री. एस. आर. पोहे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>बदनापूर, जिल्हा जालना - श्री. पी. बी. अव्हाळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९-०६-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०९-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध करुन ठेवली आहे व अपिलार्थीस दिनांक २४-०९-२००९ रोजी पाहणी करण्याकरिता निमंत्रित केले होते तथापि निवडणुकीच्या कामामुळे ही पाहणी करण्याची तारीख पुढे ढकलण्यात आली. त्यानंतर प्रथम अपिलीय अधिका-याने प्रथम अपिलावर दिनांक ०९-०९-२००९ रोजी निर्णय दिला की, अपिलार्थी यांना व्यक्तिशः माहितीची पाहणी करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी. आजपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण झालेली नाही असे आयोगास आढळून येत आहे. तसेच अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणात आहे, असे आयोगाच्या नजरेस आले आहे. अतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक २९-१२-२०१० रोजी सकाळी ११-०० ते सायंकाळी ०५-०० या वेळेत त्यांनी मागितलेली माहिती पाहणी करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या साक्षांकीत प्रती विनामूल्य पुरवाव्यात.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक २९-१२-२०१० रोजी सकाळी ११-०० ते सायंकाळी ०५-०० या वेळेत त्यांनी मागितलेली माहिती पाहणी करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या साक्षांकीत प्रती विनामूल्य पुरवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विनयकुमार दिनकर नकाते,<br>शिवाई निवास, गणेशनगर, उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, आदर्श कॉलनी, औसा रोड, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष, पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विनयकुमार दिनकर नकाते | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सचिव, पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, आदर्श कॉलनी, औसा रोड, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-०४-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०७-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी अपिलार्थी यांनी आयोगापुढे त्यांनी मागितलेली माहिती त्यांना मिळाली पाहिजे असा युक्तिवाद केला. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, लातूर यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती द्यावी असा त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय घेतला आहे असे आयोगास सांगितले.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन आयोगाच्या असे नजरेस आले आहे की, जन माहिती अधिका-याने मात्र ट्रस्टला माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही अशी भूमिका (stand) घेतली आहे.

अपिलार्थीने सदरहू ट्रस्टला त्यांच्याकडे उपलब्ध होणा-या अनुदानाचा तपशील दाखल केला आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे या बाबीवर म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्याचप्रमाणे अपिलार्थीने या प्रकरणावर अजून मा. उच्च न्यायालयाचे काही आदेश आहेत किंवा कसे हे सादर करण्यासाठी मुदत मागितली आहे. त्यास आयोग मान्यता देत आहे. याकरिता सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरीम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विनयकुमार दिनकर नकाते, शिवाई निवास, गणेशनगर, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, आदर्श कॉलनी, औसा रोड, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रुपेश नरहारी एंगडे, : अपीलकर्ता
रा. धानोरा पो. आरळ, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत,
जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, जिल्हा उप विभागीय कार्यालय,
वसमत

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रुपेश नरहारी एंगडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली - प्रतिनिधी - १.श्री. दरेकर पी. डी.<br>२.श्री. डी. डी. फुपाटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी (महसूल), वसमत, तालुका<br>वसमत, जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०९-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-०७-२००९ रोजीच्या माहितीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वसमत तहसील कार्यालयामधील सर्व स्वस्त धान्य दुकानाबाबतची सन २००६ ते जुन २००९ या कालावधीतील माहिती मागितली होती. ही माहिती जन माहिती अधिकारी आतापर्यंत त्यांना देऊ शकले नाहीत. अपिलार्थीच्या दिनांक ०१-०९-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०९-२००९ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सात दिवसाच्या आत विनाशुल्क द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, ही माहिती फार मोठ्या व्यापक स्वरुपाची आहे व ती एकत्र करण्याचे काम अजूनही प्रगतीपथावर आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांना देय आहे तथापि अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठी आहे असे आयोगाच्या नजरेस आले आहे म्हणून जन माहिती अधिका-याने त्यांच्याकडे उपलब्ध असलेली व अपिलार्थीने विचारलेली संपूर्ण माहिती त्यांना पहाणी करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने ही बाब मान्य केली. पाहणीच्या वेळी अपिलार्थीस ज्या कागदपत्राची आवश्यकता असेल त्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य देण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, वसमत यांनी करावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## **आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक २९ व ३०-१२-२०१० रोजी सकाळी ११-०० ते ०५-०० या कालावधीत त्यांनी मागितलेली माहिती पाहण्याकरिता उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीस ज्या कागदपत्राची आवश्यकता असेल त्याच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-१२-२०१०**

----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रुपेश नरहारी एंगडे, रा. धानोरा पो. आरळ, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जाधव आण्णासाहेब रामभाऊ, : अपीलकर्ता
रा. भंडारी, पो. करंजखेडा, तालुका जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जलस्वराज प्रकल्प अधिकारी, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज प्रकल्प),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा जलस्वराज प्रकल्प अधिकारी, उस्मानाबाद - प्रतिनिधी - श्री. मेघराज काशीनाथ पाटील, सचिव, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, भंडारी तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज प्रकल्प), जिल्हा परिषद, उस्मानाबाद - प्रतिनिधी - श्री. वसंत देविदासराव पोतदार, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३-०६-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०७-०९ |

(फेरसादर २६-११-
२००९)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक ०९-०७-२०१० रोजी देण्यात आलेली आहे. यावर अपिलार्थीने मागितल्याप्रमाणे सर्व माहिती मिळाली आहे अशी पोचही जन माहिती अधिकारी यांना दिली आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि वरील पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २३-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जाधव आण्णासाहेब रामभाऊ, रा. भंडारी, पो. करंजखेडा, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जलस्वराज प्रकल्प अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज प्रकल्प), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नंदकिशोर शंकरराव कदम, सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस नियंत्रण कक्ष, उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नंदकिशोर शंकरराव कदम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), उस्मानाबाद - श्री. माधव कारभारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद - प्रतिनिधी - श्री. माधव कारभारी, पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय) | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. दिलीप विठ्ठलराव उडते | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष श्री. दिलीप विठ्ठलराव उडते उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात कार्यरत आहेत व त्यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले की, त्यांना ही माहिती मिळाली नाही.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या तीन मुद्दयांवरील माहितीच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध आहेत व त्या त्यांनी आयोगाच्या निदेशावरुन अपिलार्थीस दिल्या त्या अपिलार्थीने स्वीकारल्या. अपिलार्थीने या कागदपत्रांची पाहणी करावी व या तीन मुद्दयांमधील काही बाबी राहिल्या असतील तर याबाबत १५ दिवसाच्या आत त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी करावी व त्यानंतर १५ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ती माहिती पुरवावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदकिशोर शंकरराव कदम, सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस नियंत्रण कक्ष, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भद्रे तानाजी लिंबाजी, : अपीलकर्ता
रा. भंडारी, पो. करंजखेडा, तालुका जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जलस्वराज प्रकल्प अधिकारी, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज प्रकल्प),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा जलस्वराज प्रकल्प अधिकारी, उस्मानाबाद - प्रतिनिधी - श्री. मेघराज काशीनाथ पाटील, सचिव, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, भंडारी तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज प्रकल्प), जिल्हा परिषद, उस्मानाबाद - प्रतिनिधी - श्री. वसंत देविदासराव पोतदार, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३-०६-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०७-०९ |

(फेरसादर २६-११-
२००९)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले, कि अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक ०९-०७-२०१० रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेली आहे. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाली आहे. अपिलार्थी यांनी याच पत्राच्या प्रतीवर जन माहिती अधिकारी यांना पोच दिली आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि वरील सर्व पार्श्वभूमी विचारात घेता अपील निकाली काढण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भद्रे तानाजी लिंबाजी, रा. भंडारी, पो. करंजखेडा, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जलस्वराज प्रकल्प अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज प्रकल्प), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विजयसिंह धनंजय माने,<br>श्री. संत ज्ञानेश्वर नगर, उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद - श्री. राजकुमार माने | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. दिलीप जाधव | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०६-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०७-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७-०८-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-११-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०७-०८-२००८ रोजी देण्यात आलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ०७-०८-२००८ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध असलेली माहिती जशी आहे तशी उपलब्ध करुन देण्यात आली असल्याने अपील फेटाळण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि वरील सर्व पार्श्वभुमीवर प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयामध्ये बदल करण्याची आयोगास काहीही आवश्यकता वाटत नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-१२-२०१०**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विजयसिंह धनंजय माने, श्री. संत ज्ञानेश्वर नगर, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उदध्व शामराव खरात, : अपीलकर्ता
मौ. मकोडी, तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, सेनगांव, तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८४४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सेनगांव, तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली - प्रतिनिधी - श्री. गणेश वाघ, नायब तहसीलदार | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. व्दारकादास चतुर्भूज सारडा | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२-०१-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०६-०४-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-०७-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या दिनांक ०६-०१-२००९ रोजीच्या अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सेनगाव यांच्याकडून आतापर्यंत देण्यात आलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १९-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक ०६-०४-२००९ रोजी निर्णय दिला की, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सेनगांव यांनी अर्जदारास आठ दिवसाच्या आत माहिती द्यावी. या प्रकरणात अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब झालेला आहे. अशा प्रकारे विलंब भविष्यात होणार नाही याची दक्षता तहसील कार्यालय, सेनगांव मधील सर्व अधिकारी / कर्मचा-यांनी घेणे आवश्यक आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, तहसील कार्यालय, सेनगाव यांनी दिनांक १९-०७-२०१० च्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती उपलब्ध आहे ती हस्तगत करावी असे कळविण्यात आले आहे. तथापि अपिलार्थीने माहिती घेतली नाही त्यामुळे दिनांक २२-०७-२०१० च्या पत्रान्वये माहिती अपिलार्थीच्या घरी पाठविण्यात आली. अपिलार्थीने माहिती घेण्यास इन्कर केला असे आयोगाच्यासमोर आज रोजी सादर केलेल्या दिनांक २२-१२-२०१० रोजीच्या पत्रामध्ये नमूद केले आहे. जन माहिती अधिका-याने अपिलार्थीने मागितलेली व उपलब्ध असलेली माहिती आज आयोगास दाखविली. या माहितीचा एक संच अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावा.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रतीचा एक संच अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-१२-२०१०**

----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उदध्व शामराव खरात, मौ. मकोडी, तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेनगांव, तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. उप जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. प्रल्हाद नामदेवराव खरात,<br>मौ. मकोडी, तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सेनगांव, तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सेनगांव, तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली - प्रतिनिधी - श्री. गणेश वाघ, नायब तहसीलदार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. लिलाधर अशोक तोष्णीवाल | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-०१-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६-०४-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-०७-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती दिनांक ०५-०८-२०१० रोजी अपिलार्थीस पुरविण्यात आलेली आहे. याबाबतचे पत्र अपिलार्थीने तहसीलदार, सेनगाव यांना दिनांक ०५-०८-२०१० रोजी पाठविले आहे व त्याचा अर्ज निकाली काढावा अशीही विनंती त्यांनी याच पत्रामध्ये तहसीलदार, सेनगांव यांना केली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि वरील बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खलीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रल्हाद नामदेवराव खरात, मौ. मकोडी, तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेनगांव, तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. उप जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख नईम शेख लाल,<br>नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य बोर्ड ऑफ वक्फ, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य बोर्ड ऑफ वक्फ, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य बोर्ड ऑफ वक्फ, औरंगाबाद - श्री. अजीज अहमद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य बोर्ड ऑफ वक्फ, औरंगाबाद - प्रतिनिधी - सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी - श्री. अजीज अहमद | : | उपस्थित |
| ३.४ | श्री. सत्तारखान ताहेरखान | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४-०३-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०३-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-०६-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक २२-१२-२०१० रोजी निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे व त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस पाहिजे असलेल्या ३४ साक्षांकीत प्रती आज रोजी दि. २३-१२-२०१० त्यांच्या प्रतिनिधीच्या हस्ते पाठविण्यात आल्या आहेत.

आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रतिनिधीस दिलेल्या माहितीचा एक संच पुन्हा एकदा अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पाठविणे योग्य होईल, असे आयोगाचे मत आहे.

या प्रकरणात अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी विलंब झालेला आहे. असा विलंब भविष्यात होणार नाही याची दक्षता वक्फ बोर्डाने घेणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती प्राप्त झाल्यावर अपिलार्थीस याबाबत माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करता येईल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख नईम शेख लाल, नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य बोर्ड ऑफ वक्फ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य बोर्ड ऑफ वक्फ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणेश गंगाराम काळे पाटील, : अपीलकर्ता
मु. पो. येहळेगांव (तु.), तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सरपंच / ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, येहळेगांव (तु.), तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७८८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, येहळेगांव (तु.),<br>तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी,<br>तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. चांदराव नांगरे | : | उपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष - सौ. कलेपवार | : | उपस्थित |
| ३.६ | त्रयस्थ पक्ष - श्री. कदम प्रतिनिधी - नखाडे प्रभाकर जळबा | : | उपस्थित |
| ३.७ | त्रयस्थ पक्ष - श्रीमती नंदाबाई पतंगे - प्रतिनिधी - श्री. सुभाष कचरु पतंगे | : | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ३.८ | त्रयस्थ पक्ष - सचिव, संत तुकाराम महाराज संस्थान - प्रतिनिधी - श्री. बाळासाहेब विनायकराव महाजन | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | ०७-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २०-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २१-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्रयस्थ पक्ष श्री. चांदराव नांगरे, सौ. कलेपवार, श्रीमती नंदाबाई पतंगे यांचे प्रतिनिधी श्री. सुभाष कचरु पतंगे, सचिव, संत तुकाराम महाराज संस्थान यांचे प्रतिनिधी श्री. बाळासाहेब विनायकराव महाजन हे उपस्थित आहेत.

आयोगासमोर असलेल्या उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०७-०९-२००९ रोजीच्या अर्जाव्दारे येहळेगाव (तु.), तालका कळमनुरी या ग्रामपंचायतच्या विविध विकास कामांची माहिती मागितली होती.

आज रोजी त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत. तथापि अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थी श्री. गणेश काळे यांचे राज्य माहिती आयोगाच्या खंडपीठास दिनांक ०५-१०-२०१० रोजी लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. या पत्रामध्ये त्यांनी विस्तृतपणे उल्लेख केला आहे की, त्यांनी मागितलेल्या सर्व मुद्यांशी संबंधित रेकॉर्ड जन माहिती अधिकारी यांनी दाखविले आहेत व त्यांना माहिती मिळाली आहे व त्यांची आता काही तक्रार राहिली नाही. अशा प्रकारे अपिलार्थीच्या अपिलामध्ये मागितलेली सर्व माहिती वेळोवेळीच्या ग्रामसेवकाच्या कालावधीतील त्यांना आता प्राप्त झाली आहे त्यामुळे त्यांचे अपील खारीज करावे अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत झाले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश गंगाराम काळे पाटील, मु. पो. येहळेगांव (तु.), तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, येहळेगांव (तु.), तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नंदकिशोर शंकरराव कदम,<br>सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस नियंत्रण कक्ष,<br>उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नंदकिशोर शंकरराव कदम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), उस्मानाबाद - श्री. माधव कारभारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद - प्रतिनिधी - श्री. माधव कारभारी, पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १०-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांना मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे उपस्थित राहणे आवश्यक असल्यामुळे आजची सुनावणी पुढे ढकलण्याची आयोगास विनंती केली आहे. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात आली आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>अंतरीम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक यथावकाश कळविण्यात येईल. त्यावेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदकिशोर शंकरराव कदम, सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस नियंत्रण कक्ष, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संजय उत्रेश्वर देशमाने,<br>व्दारा- चवरे सर, परंडा रोड, भूम, तालुका भूम,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, भूम, जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक, भूमि अभिलेख, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी - श्री. एम. डी. चवरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, भूमि अभिलेख, भूम, जिल्हा उस्मानाबाद - श्री. एस. एन. रामठवे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, उस्मानाबाद - श्री. एस. पी. शिंदे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या माहितीच्या दिनांक ०४-०८-२००९ रोजीच्या अर्जावर दिनांक ०९-१०-२००९ रोजी अपिलार्थीस माहिती पाठविली जी अपिलार्थीस दिनांक १२-१०-२००९ रोजी मिळाली असे अपिलार्थीच्या प्रतिनिधीने आयोगास सुनावणीच्या वेळी सांगितले. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिका-याने त्यांच्या प्रथम अपिलावर दिनांक १२-११-२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला की, संबंधित भूमापकाविरुध्द नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने माहिती मिळाल्याचे कबूल केले तथापि त्यांना विलंबाने माहिती मिळाल्यामुळे त्यांनी आयोगास जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची विनंती केली आहे. त्यांच्या दिनांक ०४-०८-२००९ रोजीच्या अर्जावर त्यांना ७० दिवसानंतर माहिती प्राप्त झाली आहे त्यामुळे ३० दिवसाच्या विहित कालावधीनंतर म्हणजे ४० दिवसांनी त्यांना माहिती मिळाली आहे याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती लावण्यात यावी,असा युक्तिवाद अपिलार्थीने केला.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, संबंधित भूमापक या प्रकरणामध्ये माहिती देण्याकरिता प्रथमदर्शनी दोषी आढळलेले आहे व त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिलेले आहेत. जन माहिती अधिकारी या प्रकरणात चौकशी करत आहेत व संबंधितास दिनांक २८-०६-२०१० रोजी नियम १० खाली कारणे दाखवा नोटीस दिली आहे व या प्रकरणात दोषी आढळल्यास पुढील निर्णय घेतील. याबाबतची विभागीय चौकशीची प्रक्रिया त्वरीत पूर्ण करण्यात यावी, असे सुनावणीच्या वेळी आयोगाने निदेश दिले.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, उस्मानाबाद यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी वर नमूद केल्याप्रमाणे विलंब केला आहे व अपूर्ण माहिती दिली आहे याकरिता संबंधित भूमापक यांच्याविरुध्द कलम १० खाली विभागीय चौकशीची सुरु केलेली प्रक्रिया त्वरित पूर्ण करण्यात यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय उत्रेश्वर देशमाने, व्दारा- चवरे सर, परंडा रोड, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, भूमि अभिलेख, भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. निवृत्ती सोपान भोजने, : अपीलकर्ता
मु. पो. काटी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काटी,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१३३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काटी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-०४-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १०-०६-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २७-०७-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन आयोगाच्या असे दृष्टोत्पत्तीस आले आहे की, अपिलार्थीने दिनांक १४-०३-२००९ रोजी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काटी यांनी अपिलार्थीस दिनांक १३-०४-२००९ रोजी दिलेली आहे व ती अपिलार्थीस प्राप्त झालेली आहे. अपिलार्थीने दिनांक २७-०४-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल करताना माहिती चुकीची व खोटी आहे असे नमूद केले आहे. यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०६-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीमध्ये सुधारणा करुन जन माहिती अधिकारी यांनी ७ दिवसात द्यावी असा निर्णय दिला आहे. पुढील प्रगती आज रोजी आयोगासमोर कोणीही उपस्थित नसल्यामुळे कळू शकली नाही. जन माहिती अधिका-याने प्रथम अपिलीय अधिका-याने दिलेल्या निर्णयाप्रमाणे सुधारीत माहिती दिली नसल्यास ती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत देणे आवश्यक ठरेल व माहिती यापूर्वी दिली असल्यास तसे त्यांनी आयोगास कळवावे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात यावे असे आयोगाचे मत झाले आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २४-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निवृत्ती सोपान भोजने, मु. पो. काटी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काटी,

तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोराळे विष्णू किसन, : अपीलकर्ता
एल. आय. सी. ऑफ इंडिया, उस्मानाबाद, शाखा
उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.
जन अपिलीय अधिकारी तथा :
आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०१ - श्री. एस. एन. पांढरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०१ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २३-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेल्या विषयाच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकीत प्रती देता येत नाही. त्या गोपनीय स्वरुपात मोडतात त्यामुळे देता येत नाहीत. अपिलार्थी यांनी केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी दि. २३.१०.२००९ रोजीच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिका-याने घेतलेला निर्णय कायम केला आहे. तसेच अपिलार्थीस फक्त Final Model Anser Sheet च्या प्रती हव्या असतील तर माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षेचा गुण पडताळणीचा निकाल जाहीर केल्यानंतर देता येईल तथापि याकरिता स्वतंत्ररित्या लेखी स्वरुपात कळविल्यास देण्यात येईल असेही प्रथम अपिलावरील निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगास प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-१०-२००९ रोजी घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोराळे विष्णू किसन, एल. आय. सी. ऑफ इंडिया, उस्मानाबाद, शाखा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे,<br>माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर - श्री. यु. व्ही. सबनीस | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. विजयकुमार नंदकिशोर अट्टल | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७-०८-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६-०९-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५-११-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०१-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व इतर त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष श्री. विजयकुमार नंदकिशोर अट्टल उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती फार मोठ्या प्रमाणात व व्यापक स्वरुपाची होती. तथापि त्यांनी २५ अर्धघाऊक विक्रेत्यांकडून सन १९८८ ते २००८ या कालावधीची उपलब्ध असलेली माहिती गोळा करुन अपिलार्थीस दिली आहे. याबाबत दिनांक २९-११-२००८ रोजी अपिलार्थी यांनी तहसीलदार, निलंगा यांना पोच दिलेली आहे. याबाबत अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-०७-२०१० रोजीच्या अर्जाव्दारे राज्य माहिती आयोगास विनंती केली आहे की, त्यांनी दिनांक २७-०८-२००८ रोजीच्या केलेल्या माहिती अधिकार अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त झालेली आहे व त्यामुळे त्यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि वरील पार्श्वभूमी विचारात घेता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात यावे असे आयोगाचे मत झाले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. किरण माणिकराव यादव,<br>आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, नळदुर्ग, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, नळदुर्ग, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद, नळदुर्ग, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - श्री. सुरवसे पी. एम. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, नळदुर्ग, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने माहितीसाठीच्या केलेल्या दिनांक २७-०७-२००९ रोजीच्या अर्जावर त्यांनी दिनांक २०-०८-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती पुरविण्यापोटीचे शुल्क रुपये १३७ इतके नगर परिषद कार्यालयात जमा करावे म्हणजे माहिती पाठविण्यात येईल असे अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे कळविले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा केलेला नाही. यानंतर अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, नळदुर्ग यांच्याकडे दिनांक १२-०९-२००९ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या संदर्भात दिनांक १८-०९-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक तेवढे शुल्क जमा करण्यासाठी कळविले तथापि त्यावर अपिलार्थीकडून प्रतिसाद मिळाला नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि वरील पार्श्वभूमी विचारात घेता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात यावे असे आयोगाचे मत झाले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २४-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किरण माणिकराव यादव, आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद, नळदुर्ग, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, नळदुर्ग, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अनिल हरि धुमाळ, : अपीलकर्ता
मु. पो. वाघोली, तालुका जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अनिल हरि धुमाळ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद - प्रतिनिधी - श्री. बनसोडे के. बी., लिपिक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद - प्रतिनिधी - श्री. भांडे आर. बी., लिपिक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९-०३-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०६-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २७-११-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जाव्दारे मागितलेली माहिती तेर गावाील एकूण आठ दुकान विक्रेत्याबाबतची असल्याने ती एकत्रित करुन अपिलार्थीस दिनांक १४-०८-२०१० रोजी दाखविण्यात आली. माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात होती म्हणून अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती पाहणी करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आली.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने दिनांक १४-०८-२०१० रोजी समक्ष माहिती पाहिलेली आहे व माहिती पाहून त्यांचे समाधान झालेले आहे. वरील पार्श्वभूमी विचारात घेता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात यावे असे आयोगाचे मत झाले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनिल हरि धुमाळ, मु. पो. वाघोली, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अब्दुल लतीफ अब्दुल मजीद,<br>७७१, 'मजीद व्हिला', रसुलपुरा, उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>महाव्यवस्थापक (वाहतुक), राज्य परिवहन, मुंबई | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>महाव्यवस्थापक (वाहतुक), राज्य परिवहन, मुंबई | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अब्दुल लतीफ अब्दुल मजीद | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक (प्रशासन), राज्य परिवहन, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई - ४०० ००८ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (वाहतुक), राज्य परिवहन, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई - ४०० ००८ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त केल्याची तारीख | | दि. २२-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २२-०५-२००९ रोजीच्या अर्जान्वये १९७३ ते आजतागायत या कालावधीतील महाराष्ट्रातील एस. टी. महामंडळाच्या बसस्थानकावरील वाणिज्य आस्थापना भाडे तत्वावर देण्याच्या कार्यपध्दतीविषयी विस्तृत माहिती मागितली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी ही माहिती महाव्यवस्थापक (वाहतुक), राज्य परिवहन, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांच्या कार्यालयात एकत्रितपणे उपलब्ध नाही व ती एस. टी. महामंडळाचे ३० विभाग यांच्याकडे उपलब्ध होऊ शकते असे सांगितले. याकरिता अपिलार्थीने उपस्थित केलेल्या ९ मुद्दयाबाबतची जी माहिती जन माहिती अधिकारी / जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे ती तसेच या ९ मुद्दयांच्या संदर्भात शासन निर्णय, आदेश, परिपत्रके आणि एस. टी. महामंडळाने काढलेले याबाबतचे आदेश, निर्णय, परिपत्रके यांच्या साक्षांकीत प्रमाणित प्रती अपिलार्थीस पुरवाव्या लागतील. अपिलार्थीने मागितलेली उर्वरीत माहिती ज्या विभागाकडे उपलब्ध असेल त्या विभागाचे पत्ते आणि जन माहिती अधिकारी यांचे पदनाम इत्यादी अपिलार्थीस कळवावे लागेल. अपिलार्थी ही माहिती प्राप्त झाल्यावर वेगवेगळे अर्ज करुन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मागणी करु शकतील, असा आयोगाचा अभिप्राय सुनावणीच्या वेळी प्रगट करण्यात आला. ही बाब अपिलार्थीने आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर मान्य केली. अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी व त्याची पुर्तता होईल असे जन अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (वाहतुक), राज्य परिवहन, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई - ४०० ००८ यांनी पहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल लतीफ अब्दुल मजीद, ७७१, 'मजीद व्हिला', रसुलपुरा, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक (प्रशासन), राज्य परिवहन, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई - ४०० ००८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (वाहतुक), राज्य परिवहन, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई - ४०० ००८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रामकृष्ण नारायण मुरुमकर,<br>रा. तित्रंज, पो. अंतरवली, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रामकृष्ण नारायण मुरुमकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, तित्रंज, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद - प्रतिनिधी - श्री. आर. डी. मगर, विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले की, त्यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिनांक ३१-०७-२०१० रोजी दिलेली आहे. त्यांनी पुढे असेही सांगितले की, माहितीची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणात होती त्यामुळे ती एकत्र करण्यास व देण्यासाठी वेळ लागला.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले की, त्यांना माहिती मिळाली आहे पण काही माहिती प्राप्त झाली नाही ती म्हणजे-

१. व्हाऊचरच्या प्रती मिळाल्या नाहीत.

१८ लाखाच्या व्हाऊचरपैकी काही व्हाऊचरच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस मिळणे बाकी आहेत. या माहितीच्या प्रती अपिलार्थीस तात्काळ नोंदणीकृत टपालाने पुरविण्यात यावी.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे उर्वरीत माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २४-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामकृष्ण नारायण मुरुमकर, रा. तित्रंज, पो. अंतरवली, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, तित्रंज, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. किरण माणिकराव यादव,<br>आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. किरण माणिकराव यादव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, होनाळा, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - श्री. इंगळे एस. बी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - प्रतिनिधी - श्री. टि. जे. जाधव, विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ३.४ | श्रीमती दंडे पी. जे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, होनाळा | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २५-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी सध्याचे व तत्कालीन, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीपोटी रुपये १५० इतक्या शुल्काचा भरणा करण्याचे अपिलार्थीस कळविण्यात आले होते. यानंतर याबाबत दिनांक ३०-११-२००९ रोजी अपिलार्थीस पुन्हा शुल्क भरण्याकरिता कळविण्यात आले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा केला नाही.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, शुल्क भरणा करा या पत्रामध्ये इतर ग्रामपंचयतीच्या थकबाकीचाही उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांनी शुल्काचा भरणा केला नाही. अपिलार्थी यांनी प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक २५-०९-२००९ रोजी केल्याचे कागदपत्रावरुन दिसत आहे तथापि यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेतल्याची प्रत आयोगासमोर सादर करण्यात आली नाही.

आज रोजी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा एक संच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडे उपलब्ध आहे तो त्यांनी अपिलार्थीस देऊ केला. अपिलार्थीने तो आयोगासमोर स्विकारला. आयोगाने अपिलार्थीस असे सूचित केले की, त्यांना आता मिळालेल्या माहितीची त्यांनी पाहणी करुन त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास त्याकरिता ते माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करु शकतात.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न केला असून त्यांचा अपिलार्थीपासून माहिती दडविण्याचा कोणताही असद्हेतू नव्हता असे दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-१२-२०१०**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किरण माणिकराव यादव, आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, होनाळा, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पाटील मधुकर पंडितराव, : अपीलकर्ता
रा. रोसा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, रोसा, तालुका परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परंडा,
तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पाटील मधुकर पंडितराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, रोसा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत ही गंभीर बाब आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी याची नोंद घ्यावी. यापुढे आयोगाच्या सुनावणीस ते उपस्थित राहतील याची समज देण्यात यावी.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे आढळून येते की, जन माहिती अधिका-याने त्यांच्याकडील दिनांक ३०-१०-२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती पाठविली आहे व ही माहिती दिनांक ०९-११-२००९ रोजी अपिलार्थीस प्राप्त झाली आहे. ही बाब अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी मान्य केली आहे. आयोगाने अपिलार्थीस असे सूचित केले की, अपिलार्थीने उपलब्ध माहितीची पाहणी करावी व त्यामध्ये काही माहिती अपुरी असल्यास किंवा त्यांना चुकीची माहिती मिळाल्याचे वाटत असल्यास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ चा आधार ते घेऊ शकतात. अतः आयोग खालीलप्रमाणे आदेश देतआहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पाटील मधुकर पंडितराव, रा. रोसा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, रोसा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भारत छोटुलाल चव्हाण, : अपीलकर्ता
कापड विक्री केंद्र, पोलीस लेन, उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उपविभाग,
उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद,
उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उपविभाग, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. अखील वजीर शेख | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे स्वतः उपस्थित नाहीत किंवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाहीत. त्यामुळे आयोगास प्रकरणाची सद्यस्थिती अवगत झाली नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन आयोगास असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ११-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे हजेरीपट क्रमांक २८६५९ यातील अनुक्रमांक ९ श्री. अखील वजीर शेख यांच्या अनपेड मजुरीबाबतची दिनांक २२-०८-२००३ ते दिनांक ३०-०९-२००३ या कालावधीशी संबंधित मागितलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस पुरविण्यात आलेली नाही असे कागदपत्रावरुन आढळून येत आहे. तरी जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उपविभाग, उस्मानाबाद यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीच्या साक्षांकीत प्रमाणित प्रती नोंदणीकृत टपालाने त्वरीत पाठवाव्या लागतील. ही माहिती जन माहिती अधिकारी उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उपविभाग, उस्मानाबाद यांनी यापूर्वी पाठविली असल्यास तसे अपिलार्थीस व आयोगास कळवावे लागेल. अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे मागितलेल्या माहितीच्या साक्षांकीत प्रमाणित प्रती पुरविल्या नसतील तर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरविण्यात याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भारत छोटुलाल चव्हाण, कापड विक्री केंद्र, पोलीस लेन, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उपविभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बाळासाहेब राघू घाडगे, | : | अपीलकर्ता |
| | मु. पो. देवधानोरा, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, उस्मानाबाद | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, उस्मानाबाद | | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ, उस्मानाबाद<br>- श्री. अे. टी. गायकवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, उस्मानाबाद<br>- श्री. प्रदीप शांतीनाथ खोबरे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना दिनांक ३१-०८-२००९ रोजी देण्यात आली आहे. तथापि ही माहिती खुलासेवजा देण्यात आलेली आहे असे आयोगास दिसून येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिनांक ०४-११-२००९ रोजी असा निर्णय दिला आहे की,-"अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना कनिष्ठ सहायक या पदातील मुलाखतीस पात्र ठरलेल्या व मुलाखतीत निवड झालेल्या उमेदवारांची यादी पाहण्यासाठी मागणी केल्यास ती त्याला दाखविण्यात यावी." यामुळे जन माहिती अधिका-याने आता अपिलार्थी यांना या याद्यांच्या साक्षांकीत प्रती विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने द्याव्यात, असे आयोगाचे मत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळासाहेब राघू घाडगे, मु. पो. देवधानोरा, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, उस्मानाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भास्कर दगडू जाधवर, : अपीलकर्ता
सार्वजनिक बांधकाम निवासाजवळ, पार्डी रोड, भूम,
तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भास्कर दगडू जाधवर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा लघुलेखक तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, कार्यालय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - श्री. व्ही. जी. बल्लाळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - श्री. मोहम्मद फय्याज | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष प्राचार्य, ज्ञानप्रसारक महाविद्यालय, कळंब | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

| | | |
|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०९-२००९ (फेरसादर ०३-११-२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने या प्रकरणी बरेच अर्ज केलेले आहेत व त्यांना वेळोवेळी उत्तर देण्यात आलेले आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये त्यांना कथित पगार व पेन्शन कोणत्या कायदेशीर नियम व तरतुदीनुसार बंद केले आहे.यावर माहिती मागितली आहे व ती त्यांना यापूर्वी देण्यात आली आहे. आज रोजी सुध्दा त्यांच्याकडे या माहितीचा एक संच उपलब्ध आहे व तो ते अपिलार्थीस देऊ शकतात.

अपिलार्थीच्या दिनांक १५-०४-२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जानुसार असे दिसते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये बराच भाग हा वस्तुस्थितीदर्शक (factual) आहे. कोणत्या कायदेशीर नियम व तरतुदीनुसार अर्जदाराचा पगार व पेन्शन बंद केली आहे. याबाबतचे शासनाचे निर्णय, आदेश इत्यादीच्या झेरॉक्स प्रती त्यांना आवश्यक आहेत, ही बाब अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये सुनावणीच्यावेळी स्पष्ट केली.

सुनावणीच्या वेळी आयोगासमोर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रतीचा एक संच दिला व तो अपिलार्थीने स्विकारला. अपिलार्थी या कागदपत्रांची पाहणी करुन आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाही करु शकतील, असे आयोगाने त्यांना सूचित केले. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भास्कर दगडू जाधवर, सार्वजनिक बांधकाम निवासाजवळ, पार्डी रोड, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा लघुलेखक तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, कार्यालय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किरण माणिकराव यादव, : अपीलकर्ता
आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी, शहापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१४१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तलाठी, शहापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - श्री. पवार पी. वाय. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - श्री. सुर्यवंशी बी. एस. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, ते ऑगस्ट २०१० पासून या पदावर कार्यरत आहेत. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २८-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी श्री. आर. बी. लांडगे यांनी उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक २९-०७-२००९ रोजी निर्णय घेताना अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना आठ दिवसात उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय घेतला आहे. तथापि त्यावरही कारवाई झालेली आयोगास दिसून येत नाही त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांच्या हातून ही चूक घडली आहे असे आयोगाचे मत झाले आहे. सबब तत्कालीन संबंधित जन माहिती अधिकारी तथा तलाठी, शहापूर, तालुका तुळजापूर श्री. आर. बी. लांडगे यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती न पुरवून दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल रुपये २५,००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत आयोगास सादर करणे आवश्यक आहे. तसेच सध्याचे जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीच्या प्रती विनामूल्य त्वरीत उपलब्ध करुन द्याव्यात.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन संबंधित जन माहिती अधिकारी तथा तलाठी, शहापूर, तालुका तुळजापूर श्री. आर. बी. लांडगे यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना विहीत मुदतीत पुरवली नाही, यामुळे त्यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचे पालन न करण्याचा प्रमाद घडला आहे. याकरिता त्यांना रुपये २५,००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी (सध्याचे) यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-१२-२०१०**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किरण माणिकराव यादव, आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, शहापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, शहापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद श्री. आर. बी. लांडगे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद)

४. जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किरण माणिकराव यादव, : अपीलकर्ता
आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी, खुदावाडी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१४१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तलाठी, खुदावाडी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - श्री. काळे ए. बी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - श्री. सुर्यवंशी बी. एस. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती त्यांना दिनांक ०४-०८-२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविण्यात आली आहे. उर्वरीत माहितीची व्याप्ती फार व्यापक प्रमाणात असल्यामुळे ते ती माहिती अपिलार्थीस देऊ शकले नाहीत. ही माहिती अपिलार्थीस पाहण्यासाठी उपलब्ध करुन देणे शक्य होते परंतु तसे करण्यात आले नाही असे आयोगाच्या दृष्टोत्पत्तीस आले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठी आहे असे सागितल्यामुळे अपिलार्थी यांना प्राप्त झालेल्या माहिती व्यतिरिक्त बाकीची माहिती त्यांना पहाणी करण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन द्यावी. पाहणीच्या वेळी अपिलार्थीस ज्या कागदपत्राची आवश्यकता असेल त्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य देण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांनी करावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीने मागितलेली उर्वरीत माहिती पाहण्यासाठी एक दिवस निश्चित करुन अपिलार्थी यांनी मागितलेली उर्वरीत माहिती त्यांना पाहण्याकरिता उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीस ज्या कागदपत्राची आवश्यकता असेल त्याच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-१२-२०१०** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किरण माणिकराव यादव, आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, खुदावाडी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. किरण माणिकराव यादव,<br>आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, मंगरुळ, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१४१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तलाठी, मंगरुळ, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - श्री. जगताप बी. एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - श्री. सुर्यवंशी बी. एस. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६-०६-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-०५-२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या केलेल्या अर्जावर त्यांनी दिनांक १६-०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना एकूण ५९ पृष्ठांच्या माहितीकरिता प्रतिपृष्ठ रुपये दोन याप्रमाणे चलनाने शुल्काचा भरणा करावा असे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थी यांनी ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०७-२००९ रोजी घेतलेल्या त्यांच्या प्रथम अपिलावरील सुनावणीच्या वेळी मान्य असल्याचे कबूल केले आहे, असे दिसून आले आहे. तथापि अपिलार्थीने त्यांना कोणत्या लेखाशीर्षाखाली शुल्क भरावे याचा उल्लेख केला नसल्यामुळे त्यांनी शुल्क भरले नाही असे प्रथम अपिलात नमूद केले आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरवावयाच्या माहितीची ५९ पृष्ठे त्यांना पुरवू शकतात असे आयोगास सांगितले. यावर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी असे आयोगाने आदेश दिले. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्यावर माहितीची पाहणी करुन अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करु शकतात. तहसीलदार, तुळजापूर यांनी उपरोक्त माहिती अपिलार्थीस तात्काळ पुरविण्यासाठी व्यक्तिशः लक्ष पुरवावे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किरण माणिकराव यादव, आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, मंगरुळ, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख अन्वर शेख मन्नु, : अपीलकर्ता
रा. लेबर कॉलनी, घर नंबर ४९, ब्लॉक नंबर ४,
नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड - श्री. तेलंग आर. एन. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड - डॉ. श्री. के. एस. भोपळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०३-२००८ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख -

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १२-०६-२००८

(फेरसादर ०९-१०-२००९)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११-०२-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये सन १९९५ पासून २००७ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

१. चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना कायमस्वरुपी नियुक्त्या ज्या शासन आदेशाने देण्यात आल्या त्याच्या प्रती,

२. कायमस्वरुपी नियुक्ती देताना शासनाच्या नियमाप्रमाणे सेवा योजन कार्यालयाकडून उमेदवारांची मागणी करण्यात आलेले पत्र,

३. त्याचप्रमाणे वर्तमानपत्रात जाहिरात दिलेल्या जाहिरातीची सत्यप्रत,

४. कायमस्वरुपी नियुक्ती देण्यासाठी रोजंदारीवर काम केलेल्या कर्मचा-याची जेष्ठता यादी,

५. नियुक्त्या केल्या असेल तर कायमस्वरुपी नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची यादी व आदेशाची सत्यप्रत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना दिनांक २७-०५-२००८ रोजी नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात आलेली आहे. सदरची माहिती त्यांना विनामूल्य देण्यात आलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १६-०४-२००८ रोजी सुनावणी घेतलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, अपिलार्थी हे रुग्णालयात बदली कर्मचारी म्हणून रोजंदारीवर काम करीत आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दिनांक २७-०५-२००८ रोजी माहिती पाठविण्यात आलेली आहे या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २८-१२-२०१०**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख अन्वर शेख मन्नु, रा. लेबर कॉलनी, घर नंबर ४९, ब्लॉक नंबर ४, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुंदरराव भाऊराव पाटील, : अपीलकर्ता
मु. आलेश्वर, पो. डोंजा व्हाया सोनारी, तालुका परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, परंडा, जिल्हा उस्मानाबाद - श्री. मागाडे के. जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परंडा, जिल्हा उस्मानाबाद - प्रतिनिधी - श्री. इंगळे पी. एस. विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती एकत्र करुन दिनांक २६-०७-२०१० रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थीस ही माहिती मिळाली आहे, तसे अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २०-०८-२०१० रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. अपिलार्थीने पुनश्च दिनांक ०९-१२-२०१० रोजीच्या पत्राने आयोगास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त झाल्याने त्यांचे अपील निकाली काढण्यात यावे अशी विनंती केली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुंदरराव भाऊराव पाटील, मु. आलेश्वर, पो. डोंजा व्हाया सोनारी, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सय्यद कमालपाशा बाशुमिया,<br>रा. गांधीनगर, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, डिकसळ, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, कळंब,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद कमालपाशा बाशुमिया | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, डिकसळ, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद - श्री. शिवाजी बलभिमराव मोरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, कळंब, जिल्हा उस्मानाबाद - श्री. वाघमारे व्ही. जे. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७-०८-२००९ |

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि. ०४-०९-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने ग्रामपंचायत डिकसळ अंतर्गत असलेल्या घर नंबर १२७२, २१४२, २००२/३, ३५३, १९९५/१ च्या नोंद घेणेबाबतचा टरावाच्या, प्रोसेडिंग बुकच्या आकारणी केलेल्या टॅक्सच्या पावत्या, पक्षकाराने दाखल केलेल्या कागदपत्राच्या नकलासहीत सत्यप्रती देण्यात याव्यात अशी साल सन १९९४ ते आजपर्यंतची माहिती त्यांच्या दिनांक २७-०४-२००८ रोजीच्या अर्जान्वये मागितली होती. अपिलार्थीचा माहितीसाठीचा सदरचा अर्ज दिनांक २७-०४-२००९ जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला आहे. तेव्हापासून आजपर्यंत अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती उपलब्ध झाली नाही त्यामुळे ते ही माहिती अपिलार्थीस देऊ शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०७-२००९ रोजीच्या पत्रान्वये सन १९९४ नंतरच्या अभिलेख्याचा शोध घेतला असता माहिती उपलब्ध नाही असे अपिलार्थीस कळविले आहे. त्यामुळे १९९४ पासूनचे कर्मचारी दोषी ठरत आहेत. या कालावधीत ही कागदपत्रे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर होती ते सर्व आयोगास दोषी असल्याचे आढळून येत आहे त्यामुळे त्यांच्याविरुध्द सार्वजनिक अभिलेखे अधिनियम २००५ अन्वये कारवाई करणे आयोगास आवश्यक वाटत आहे. याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या प्रकरणी विस्तृत चौकशी करावी व चौकशीत दोषी आढळून आलेले अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द नुसार कारवाई करावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणात विस्तृत चौकशी करावी व चौकशीत दोषी ठरलेल्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द सार्वजनिक अभिलेखे अधिनियम २००५ नुसार कारवाई करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २८-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद कमालपाशा बाशुमिया, रा. गांधीनगर, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, डिकसळ, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बसवराज लिंगप्पा जमादार, : अपीलकर्ता
मु. पो. निलेगाव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, इटकळ, तालुका
तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, कळंब,
जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बसवराज लिंगप्पा जमादार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, इटकळ, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १३-०४-२००९ रोजीच्या अर्जान्वये सन २००७-०८ या कालावधीची मौजे इटकळ ग्रामपंचायतीची सिमेंट रोड व इतर कामांची विस्तृत माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेली ही माहिती सध्याचे ग्रामसेवक देऊ शकत नाही असे त्यांनी अपिलार्थीस कळविले असल्याचे अपिलार्थीने आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास सांगितले. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांना यासंदर्भात लिहिलेल्या पत्राची प्रत अपिलार्थीने आयोगास दिली आहे. या प्रकरणात गट विकास अधिकारी, पंचायत समिती, यांनी लक्ष घालणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतमध्ये ही माहिती उपलब्ध करुन देण्याची त्यांची जबाबदारी आहे यासाठी त्यांनी पाठपुरावा करावा व सर्व माहिती एकत्रित करुन ती माहिती अपिलार्थीस विनामूल्य पाहण्यासाठी एक तारीख निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीने या माहितीची पाहणी केल्यानंतर त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य अपिलार्थीस देण्यात याव्यात.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत वरीलप्रमाणे माहिती ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होईल याकरिता कारवाई योजावी व त्यानंतर अपिलार्थीस एक तारीख निश्चित करुन त्यांनी मागितलेली माहिती पाहणी करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बसवराज लिंगप्पा जमादार, मु. पो. निलेगाव, तालुका तुळजापूर, जिल्हा

उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, इटकळ, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. कोरबू शेख अहमद जाफर,<br>मु. पो. (क) तडवळे, तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, कार्यालय ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी तथा सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, कसबे तडवळे तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद - प्रतिनिधी - श्री. एस. बी. चव्हाण, वरिष्ठ सहायक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना दोन टप्प्यामध्ये दिनांक २२-०९-२००९ व दिनांक १६-११-२००९ रोजी देण्यात आलेली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, प्रथम पुरविलेल्या माहितीवर अपिलार्थीने अपूर्ण माहिती प्राप्त झाली, अशी पोच दिनांक २९-०९-२००९ रोजी दिली आहे व त्यानंतर त्यांनी उर्वरित माहिती अपिलार्थीस पोस्टाने वर नमूद केल्याप्रमाणे पाठविली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीस माहिती मिळाली आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २८-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कोरबू शेख अहमद जाफर, मु. पो. (क) तडवळे, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी तथा सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, कसबे तडवळे तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जि. एस. रायबोळे,<br>मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कार्यालय, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कार्यालय, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६४५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था संलग्न जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, नांदेड - श्री. एम. ए. भोसले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, नांदेड - श्री. एन. व्ही. आघाव | : | उपस्थित |
| ३.४ | सचिव नांदेड जिल्हा लेबर कॉन्ट्रॅक्ट को ऑप. सोसायटीज फेडरेशन, जिल्हा नांदेड - श्री. विशाल विजयकुमार | : | उपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष - मंगल पेंटिग ॲण्ड रोड वर्क्स म. स. स. म. नांदेड व इतर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-०९-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व सचिव, नांदेड जिल्हा लेबर कॉन्ट्रॅक्ट को ऑप. सोसायटीज फेडरेशन, जिल्हा नांदेड उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी सर्व उपस्थितांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी क्रमांक १ तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था संलग्न जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, नांदेड यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २८-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०५-०९-२००९ रोजी पुरविण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या दिनांक २०-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-११-२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला असून या निर्णयामध्ये उर्वरीत माहितीकरिता संबंधित संस्था व संबंधित अपिलीय अधिकारी उप/सहायक निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे दाद मागावी असे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०९-२००९ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली आहे व उर्वरीत माहितीकरिता अर्ज सचिव, मजूर फेडरेशन यांच्याकडे पाठविण्यात येत आहे असे कळविले आहे. त्यानुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी क्रमांक २ यांनी दिनांक १३-११-२००९ रोजी माहिती पुरविली आहे व त्याची पोच अपिलार्थीने त्या पत्रावर दिल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि वरील बाबी विचारात घेता अपिलार्थीस माहिती मिळाली आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे व खालील आदेश देत आहे.

.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-१२-२०१०**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जि. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था संलग्न जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शेख अफसर शेख बाबु,<br>रा. हमालपुरा मस्जीद जवळ, नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, गोरक्षण संस्था, आयुर्वेदिक दवाखान्यासमोर,<br>वजिराबाद, नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सचिव, गोरक्षण संस्था, आयुर्वेदिक दवाखान्यासमोर, वजिराबाद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. या प्रकरणात सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास

आवश्यक वाटते. याकरिता सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरीम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणी तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख अफसर शेख बाबु, रा. हमालपुरा मस्जीद जवळ, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, गोरक्षण संस्था, आयुर्वेदिक दवाखान्यासमोर, वजिराबाद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बसवराज लिंगप्पा जमादार, : अपीलकर्ता
मु. पो. निलेगाव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गुळहळ्ळी,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१४२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बसवराज लिंगप्पा जमादार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गुळहळ्ळी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - श्री. घुगरे बी. पी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, त्यांनी दिनांक २०-०२-२००९ रोजी कार्यभार स्विकारला आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गुळहळ्ळी, तालुका तुळजापूर श्री. आडे एस. ए. यांनी त्यांना आतापावेतो अपूर्ण पदभार दिला, पूर्ण पदभार दिला नाही त्यामुळे ते अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस पुरवू शकले नाही.

अपिलार्थीने आयोगास सांगितले की, त्यांना दिनांक ०७-०८-२००९ रोजी तत्कालीन ग्रामसेवकाकडून तीन मुद्दयांवरील माहिती मिळालेली आहे. उर्वरीत माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने बघणे आवश्यक आहे. या ग्रामपंचायतीचा कार्यभार त्वरीत हस्तांतर होईल याबाबत कार्यवाही योजावी व हा कार्यभार सध्याच्या ग्रामसेवकास मिळाल्यानंतर अपिलार्थीने मागितलेल्या उर्वरीत माहितीची अपिलार्थी यांनी पाहणी करावी. ही पाहणी करण्यासाठी अपिलार्थी यांना तारीख देण्यात यावी. अपिलार्थी यांनी यास आयोगासमोर सहमती दर्शविली.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांनी या प्रकरणात व्यक्तिशः लक्ष पुरवावे व तत्कालीन ग्रामसेवक हे संपूर्ण कागदपत्रे सध्याच्या ग्रामसेवकाकडे हस्तांतरीत करतील याकरिता कार्यवाही योजावी. त्याचप्रमाणे आतापर्यंत ही कागदपत्रे त्यांच्याजवळ का ठेवली याबाबतचा खुलासा त्यांच्याकडून घ्यावा. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. आडे एस. ए. यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु करावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गुळहळ्ळी, तालुका तुळजापूर यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांच्याकडून संपूर्ण कागदपत्र उपलब्ध करुन घेऊन अपिलार्थीस एक तारीख निश्चित करुन वर नमूद केल्याप्रमाणे त्यांनी मागितलेली माहिती पाहणी करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांनी या प्रकरणात व्यक्तिशः लक्ष पुरवावे व तत्कालीन ग्रामसेवक हे संपूर्ण कागदपत्रे सध्याच्या ग्रामसेवकाकडे हस्तांतरीत करतील याकरिता कार्यवाही योजावी. त्याचप्रमाणे आतापर्यंत ही कागदपत्रे त्यांच्याजवळ का ठेवली याबाबतचा खुलासा त्यांच्याकडून घ्यावा. तसेच तत्कालीन जन माहिती

अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. आडे एस. ए. यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बसवराज लिंगप्पा जमादार, मु. पो. निलेगाव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गुळहळ्ळी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किरण माणिकराव यादव, : अपीलकर्ता
आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी, केशेगाव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१४१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तलाठी, केशेगाव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - श्री. पाटील एस. जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - श्री. सुर्यवंशी बी. एस. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, त्यांनी नुकताच फेब्रुवारी २०१० मध्ये पदभार हाती घेतला आहे व त्यांना तत्कालीन तलाठी यांच्याकडून दप्तर नुकतेच प्राप्त झाले आहे. या अर्जावर ते त्वरीत कारवाई करतील असे त्यांनी आयोगास आश्वासन दिले. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी श्री. बी. जी. भुरे यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०६-२००९ रोजीच्या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०७-२००९ रोजी निर्णय देऊन सुध्दा अपिलार्थीस माहिती पुरविली नाही याचा खुलासा त्यांना द्यावा लागेल. सबब तत्कालीन संबंधित जन माहिती अधिकारी तथा तलाठी, केशेगाव, तालुका तुळजापूर श्री. बी. जी. भुरे यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती विहित मुदतीत न पुरवून दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत आयोगास सादर करणे आवश्यक आहे.

सध्याचे जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणात असल्यामुळे अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती अपिलार्थीस पाहण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन द्यावी. पाहणीच्या वेळी अपिलार्थीस ज्या कागदपत्राची आवश्यकता असेल त्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य देण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांनी करावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन संबंधित जन माहिती अधिकारी तथा तलाठी, केशेगाव, तालुका तुळजापूर श्री. बी. जी. भुरे यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना विहीत मुदतीत पुरवली नाही, यामुळे त्यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचे पालन न करण्याचा प्रमाद घडला आहे. याकरिता त्यांना रुपये २५,००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी (सध्याचे) यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहण्यासाठी एक दिवस निश्चित करुन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना पाहण्याकरिता उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीस ज्या

कागदपत्राची आवश्यकता असेल त्याच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २८-१२-२०१०**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किरण माणिकराव यादव, आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, केशेगाव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, केशेगाव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद श्री. बी. जी. भुरे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद)

४. जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम,<br>घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, मदिनातुल उलूम मुलांची उर्दू प्राथमिक शाळा, लालबाडा, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलूम मुलांची उर्दू प्राथमिक शाळा, लालबाडा, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड - प्रतिनिधी - श्री. अशोक रामराव, उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलूम मुलांची उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांच्याकडून अपिलार्थीला पाठविण्यात आलेली आहे. यावर आयोगाने त्याचा तपशील विचारला असता ते आयोगास तपशील देऊ शकले नाहीत तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना कळविले आहे की, मदिनातुल उलूम प्राथमिक शाळा, लालबाडा, नांदेड येथे अर्ज केला होता परंतु या अर्जातील माहिती न मिळाल्यामुळे अपील केले. तथापि दोन्ही अपील अर्जातील माहिती मला प्राप्त झाली. त्याची एक प्रत आज रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सादर केली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीने त्यांचे व्दितीय अपील क्रमांक १६४६ ते स्वखुशीने मागे घेत असल्याने ते रद्द करण्यात यावे अशी त्यांच्या दिनांक १४-०७-२०१० रोजीच्या पत्राव्दारे आयोगास विनंती केली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलूम मुलांची उर्दू प्राथमिक शाळा, लालबाडा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विनोद दिगांबर सोंडारे, : अपीलकर्ता
मु. पो. हिप्परगा (माळ), तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, छत्रपती शाहू निवासी मतिमंद विद्यालय,
कंधार, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६५५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विनोद दिगांबर सोंडारे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, छत्रपती शाहू निवासी मतिमंद विद्यालय, कंधार, जिल्हा नांदेड - श्री. पठाण महेताब ईस्माईल | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड - श्री. संजय रा. कदम | : उपस्थित |
| ३.४ | नरसाबाई माता निवासी अपंग विद्यालय, वडगाव - पटणे सोमेश्वर महालिंग, संस्थेचा प्रतिनिधी | : उपस्थित |
| ३.५ | एकलव्य निवासी अंध विद्यालय, बा-हाळी - इखे रत्नाकर कृष्णराव, शिक्षक - मुख्यध्यापकाचे प्रतिनिधी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष श्री. पटणे सोमेश्वर महालिंग, इखे रत्नाकर कृष्णराव उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, छत्रपती शाहू निवासी मतिमंद विद्यालय, कंधार यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती त्यांना पुरविण्यात आलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने माहिती मागण्याकरिता उपोषण केले होते व त्या उपोषणाच्या संदर्भात त्यांना या संस्थेखालील येणा-या तीन शाळांची माहिती दिल्यानंतर माहिती मिळाल्याची पोच देऊन अपिलार्थीने उपोषण मागे घेतले होते.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास सांगितले की, त्यांना माहिती मिळाली आहे परंतु एका मुद्दयावर माहिती बरोबर मिळालेली नाही. त्यांनी संस्थेच्या तीन शाळेत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची जात पडताळणी प्रमाणपत्रे मागितली होती त्याऐवजी त्यांना जातीचे प्रमाणपत्रे देण्यात आलेली आहेत. ही बाब आयोगासमोर जन अपिलीय अधिकारी यांनी तपासली असता बरोबर आढळून आली त्यामुळे अपिलार्थीस जात पडताळणी प्रमाणपत्रे द्यावी लागतील. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, तीन शाळामधून एकूण २१ कर्मचा-यांची जात पडताळणी प्रमाणपत्रे देय आहे ती अपिलार्थीस देणे आवश्यक ठरते. जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती उपलब्ध नसल्याचे तसे अपिलार्थीस कळविणे आवश्यक होते. अपिलार्थीस माहिती देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी लक्ष द्यावे व जात पडताळणी प्रमाणपत्रे उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत खात्री करावी व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस ते पुरवतील याचा पाठपुरावा करावा.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, छत्रपती शाहू निवासी मतिमंद विद्यालय, कंधार, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत वर नमूद केल्याप्रमाणे २१ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रमाणित प्रती विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवाव्यात. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा करुन पुढील कार्यवाही योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-१२-२०१०**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विनोद दिगांबर सोंडारे, मु. पो. हिप्परगा (माळ), तालुका बिलोली, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, छत्रपती शाहू निवासी मतिमंद विद्यालय, कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, : अपीलकर्ता
घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, मदिनातुल उलूम मुलांची उर्दू प्राथमिक शाळा, लालबाडा, नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६५८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलूम मुलांची उर्दू प्राथमिक शाळा, लालबाडा, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड - प्रतिनिधी, उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलूम मुलांची उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांच्याकडून अपिलार्थीला पाठविण्यात आलेली आहे. यावर आयोगाने त्याचा तपशील विचारला असता ते आयोगास तपशील देऊ शकले नाहीत तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना कळविले आहे की, मदिनातुल उलूम प्राथमिक शाळा, लालबाडा, नांदेड येथे अर्ज केला होता परंतु या अर्जातील माहिती न मिळाल्यामुळे अपील केले. तथापि दोन्ही अपील अर्जातील माहिती मला प्राप्त झाली. त्याची एक प्रत आज रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सादर केली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीने त्यांचे व्दितीय अपील क्रमांक १६५८ ते स्वखुशीने मागे घेत असल्याने ते रद्द करण्यात यावे अशी त्यांच्या दिनांक १४-०७-२०१० रोजीच्या पत्राव्दारे आयोगास विनंती केली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलूम मुलांची उर्दू प्राथमिक शाळा, लालबाडा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेषेराव एकनाथ टेकाळे, : अपीलकर्ता
मु. पो. कुपटी (मा), तालुका माहुर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेषेराव एकनाथ टेकाळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालय, जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड - प्रतिनिधी - उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०१-०९-२००९ रोजीच्या अर्जासोबत दिनांक ०१-१२-२००८ चा अर्ज जोडला आहे. त्यामधील माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. याबाबत जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले की, अपिलार्थीने ही माहिती ग्रामपंचायत तसेच शाळेकडून घ्यावी. अपिलार्थीने त्यांना ही माहिती मिळाली नाही असे सुनावणीच्या वेळी आयोगास सांगितले.

अपिलार्थी हे जेष्ठ नागरिक आहेत त्यामुळे त्यांना दुस-या कार्यालयाकडे पाठविणे आयोगास योग्य वाटत नाही. तरी जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे ज्या कार्यालयाकडे ही माहिती उपलब्ध आहे त्यांच्याकडून ही माहिती प्राप्त करुन घ्यावी व ती अपिलार्थीस द्यावी. या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर यांना संबंधित ग्रामपंचायत, कुपटी (मा), तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना आदेश देऊन ही माहिती जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माहूर यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावी लागेल. त्याचप्रमाणे शाळेच्या मुख्याध्यापकाकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी व या दोनही माहिती एकत्रित करुन तात्काळ अपिलार्थीस पुरवावी लागेल. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित कार्यालयातून अपिलार्थीने मागितलेली माहिती एकत्र करुन त्याच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-१२-२०१०**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेषेराव एकनाथ टेकाळे, मु. पो. कुपटी (मा), तालुका माहुर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

कार्यालय, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख अन्वर शेख मन्नु, : अपीलकर्ता
रा. लेबर कॉलनी, घर नंबर ४९, ब्लॉक नंबर ४,
नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
प्रशासकीय अधिकारी, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड - श्री. वाळकीकर एस. एम. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. धनंजय पाठक, दौलत ढगे, कपील कुलकर्णी, श्रीनिवास नाईक | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०९-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०७-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व सर्व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना दिनांक १७-०८-२००९ रोजी देण्यात आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही सांगितले की, अपिलार्थी हे त्यांच्याच कार्यालयात तात्पुरत्या स्वरुपात चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून काम करीत आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली आहे. प्राप्त माहितीवर अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ते माहिती अधिकार अधिनियमतील तरतुदीनुसार कार्यवाही करु शकतील.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख अन्वर शेख मन्नु, रा. लेबर कॉलनी, घर नंबर ४९, ब्लॉक नंबर ४, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बुरफुले मारोती संगोजी, : अपीलकर्ता
मु. इमामवाडी, पो. तालुका कंधार, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
घोडेगांव, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे

जन अपिलीय अधिकारी तथा :
प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
घोडेगांव, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बुरफुले मारोती संगोजी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगांव, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे - श्री. बी. के. केदारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगांव, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे - प्रतिनिधी - श्री. लोमेश स. सलामे, सहायक प्रकल्प अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी आयोगास सांगितले की, परिक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या प्रती त्यांना देण्यात याव्यात. पुढे त्यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, असाच एक अर्ज त्यांचे बंधू श्री. शंकर संगोजी बुरफुले यांनी केला आहे.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, प्रश्नाधीन परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स प्रती ते अपिलार्थीस देऊ शकत नाहीत कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कलम ८(१)(ङ) व (ञ)देखील अपिलार्थीस ही माहिती देय होऊ शकत नाहीत. त्यांनी पुढे आयोगास असेही सांगितले की, अपिलार्थीचा दिनांक १४-०९-२००९ रोजीचा प्रश्नाधीन अर्ज त्यांना प्राप्त झालेला नाही. त्यामुळे ते यावर कारवाई करु शकले नाहीत.अपिलार्थीच्या सोईसाठी त्यांच्या माहिती अर्जाची एक प्रत आयोगाने जन माहिती अधिकारी यांना सुनावणीच्या वेळी सर्वांसमक्ष दिली व ती जन माहिती अधिकारी यांनी ती स्वीकारली.

अशाच प्रकरणात केंद्रीय माहिती आयोग व राज्य माहिती आयोगाने वेळोवेळी निर्णय घेऊन उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स प्रती देता येणार नाही असा निर्णय घेतला आहे त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देय होत नाही. तथापि अपिलार्थीने आयोगास सुनावणीच्या वेळी विनंती केल्याप्रमाणे दिनांक २२-०२-२००९ रोजी स्वयपाकी पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांच्या यादीची सत्यप्रत व त्याचप्रमाणे दिनांक २७-०२-२००९ च्या निवड यादीमध्ये समाविष्ट झालेल्यांची यादी आणि कोणत्या कार्यालयात नियुक्ती देण्यात आली याची माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस दिनांक २२-०२-२००९ रोजी स्वयपाकी पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांच्या यादीची सत्यप्रत व त्याचप्रमाणे दिनांक २७-०२-२००९ च्या निवड यादीमध्ये समाविष्ट झालेल्यांची यादी आणि त्यांना कोणत्या कार्यालयात नियुक्ती देण्यात आली याची माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने देण्यात यावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-१२-२०१०**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बुरफुले मारोती संगोजी, मु. इमामवाडी, पो. तालुका कंधार, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगांव, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगांव, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संतोष रामराव बनसोडे,<br>समतानगर, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड - प्रतिनिधी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगास या प्रकरणाची वस्तुस्थिती सांगू शकले नाहीत. तथापि अपिलार्थीस ३१५ पृष्ठांची माहिती पुरविण्यासाठी शुल्काचा भरणा करावा असे जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे असे त्यांना माहिती आहे असे त्यांनी आयोगास सांगितले. तथापि याबाबतचा पुरावा ते आयोगास सादर करु शकले नाहीत. या प्रकरणात अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब झाला आहे त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी. माहिती प्राप्त झाल्यावर अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करु शकतील.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती जी त्यांच्याजवळ उपलब्ध आहे व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने वर नमूद केल्याप्रमाणे सांगितली असल्यामुळे ती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष रामराव बनसोडे, समतानगर, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. काळबा शंकरराव हनवते,<br>अध्यक्ष, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, बहुजन अधिकारी व कर्मचारी संघ, विष्णुपुरी, नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, राजर्षी शाहु महाविद्यालय, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. काळबा शंकरराव हनवते | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, राजर्षी शाहु महाविद्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड - प्रतिनिधी - श्री. दीपक देशपांडे, लघुलेखक | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. व्ही. पी. रामतीर्थ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास सांगितले की, त्यांनी मागितलेल्या ११ मुद्दयांवरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक ६, ७ व ९ मुद्दे सोडून इतर मुद्दयांवरील माहिती त्यांना प्राप्त झालेली आहे. या तीन मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल व जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती उपलब्ध नसेल तर ही माहिती उपलब्ध होण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांना स्वतः व्यक्तिशः लक्ष पुरवावे लागेल. अशा प्रकारे मुद्दा क्रमांक ६, ७ व ९ या मुद्दयांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पुरवावी लागेल. अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ६, ७ व ९ या मुद्दयांवरील माहितीच्या साक्षांकीत प्रमाणित प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-१२-२०१०** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. काळबा शंकरराव हनवते, अध्यक्ष, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, बहुजन अधिकारी व कर्मचारी संघ, विष्णुपुरी, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, राजर्षी शाहु महाविद्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जयभीम संभाजी पाटील, : अपीलकर्ता
भिम टेकडी, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप वनसंरक्षक, उपवन कार्यालय, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक वन संरक्षक (रो. ह. यो.), नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल, उप वनसंरक्षक, नांदेड यांचे कार्यालय, नांदेड - श्री. एम. के. आव्हाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक (रो. ह. यो.), नांदेड - श्री. चंद्रशेखर सरोदे | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. शेख महंमद शे. हबीब | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती पहिल्या टप्प्यात दिनांक १०-१२-२०१० रोजी देण्यात आली आहे व उर्वरीत माहिती संबंधित शाखेकडून प्राप्त होताच अपिलार्थीस देण्यात येईल असे अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. अपिलार्थीने ही माहिती प्राप्त झाली आहे त्याची पोच दिली आहे. तथापि माहिती अपूर्ण व उशीरा मिळाली आहे अशी अपिलार्थीने नोंद केली आहे. यानंतर उर्वरीत माहिती (१९ पृष्ठे) जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-१२-२०१० रोजी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठविली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब लावला आहे अशा प्रकारचा विलंब भविष्यात होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जयभीम संभाजी पाटील, भिम टेकडी, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल, उप वनसंरक्षक, नांदेड यांचे कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक (रो. ह. यो.), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गायकवाड भाऊसाहेब मष्णाजीराव, : अपीलकर्ता
मु. पो. गायकवाड गल्ली, मुखेड, तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
क्षेत्रिय मॅनेजर, शेळी मेंढी फार्म, मुखेड, तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
क्षेत्रिय मॅनेजर, मेंढी फार्म, मुखेड, तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा प्रक्षेत्र व्यवस्थापक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, मुखेड, जिल्हा नांदेड - श्री. शा. पी. पाटील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे - १६ - डॉ. श्री. सु. ना. बंगाडे | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. क. ई. मरकंटवाड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०५-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती दिनांक १०-०६-२००९ रोजी उपलब्ध ठेवण्यात आलेली आहे. तथापि अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागितली होती परंतु ते माहिती घेण्यासाठी आले नाहीत. त्यामुळे त्यांना माहिती पुरविण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्याचा त्यांचा कोणताही असद्‌हेतू आहे असे आयोगास आढळून आले नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. जन माहिती अधिकारी यांनी तयार केलेली माहिती अपिलार्थीस त्यांनी तात्काळ विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे पाठवावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती जी त्यांच्याकडे उपलब्ध आहे,ती अपिलार्थीस आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गायकवाड भाऊसाहेब मष्णाजीराव, मु. पो. गायकवाड गल्ली, मुखेड, तालुका

मुखेड, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रक्षेत्र व्यवस्थापक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे - १६ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, विशेष समाजकल्याण अधिकारी यांचे कार्यालय, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६८८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नांदेड - श्री. अ. मो. शेदारकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग, लातूर - प्रतिनिधी - श्री. अरवत बी. जी., समाजकल्याण अधिकारी, गट-ब | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नाही तसेच याबाबत अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २२-०७-२००९ रोजीच्या पत्राव्दारे कळविण्यात आले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १४-०८-२००९ रोजी निर्णय देताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेळेत कळविले नाही, तथापि अपील अमान्य करण्यात येत आहे, अशी नोंद केली आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघांनीही अपिलार्थीस सदरची माहिती कोणत्या विभागाकडे आहे याचा शोध घेऊन कळविणे योग्य झाले असते असे आयोगाचे मत आहे. तरी याबाबत आता सदरची माहिती कोणत्या विभागाशी संबंधित आहे याचा शोध घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तसे कळवावे म्हणजे अपिलार्थी त्या विभागाकडे माहितीसाठीचा अर्ज दाखल करु शकतील.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पुपलवाड भागवत आत्माराम, : अपीलकर्ता
मु. पो. पाटोदा (त.ब.), तालुका नायगाव (खै),
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, नायगाव (खै), : उत्तरवादी
तालुका नायगाव (खै), जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगाव (खै),
तालुका नायगाव (खै), जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नायगाव (खै), तालुका नायगाव (खै), जिल्हा नांदेड - श्री. बी. जी. येवतीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगाव (खै), तालुका नायगाव (खै), जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-११-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१-११-२००८ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०४-०२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी हे यशदा, पुणे येथे प्रशिक्षणासाठी गेले असल्यामुळे अनुपस्थित असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नायगाव (खै) यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती दिनांक २३-११-२०१० रोजी अपिलार्थीस देण्यात आलेली आहे. याबाबतची पोच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीस दिनांक २३-११-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झालेली आहे व याबाबतचे अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांना लिहिलेले दिनांक २३-११-२०१० रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले आहे. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पुपलवाड भागवत आत्माराम, मु. पो. पाटोदा (त.ब.), तालुका नायगाव (खै), जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नायगाव (खै), तालुका नायगाव (खै), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगाव (खै), तालुका नायगाव (खै), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जि. एस. रायबोळे,<br>मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उपजिल्हाधिकारी (रोहयो), कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड- श्री. एम. व्ही. नरंगळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - परिवार प्रतिष्ठाण, नांदेड, स्वप्नील माधवराव जोंधळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९-११-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक २६-०८-२००९ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती, जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी दिनांक ०९-११-२००९ रोजी सुनावणी घेतली आहे व सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते त्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या समक्ष अपीलकर्त्यास माहिती पुरविण्यात आलेली आहे व त्यांचे समाधान झाले आहे.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन जन माहिती अधिकारी यांनी सांगितलेली माहिती बरोबर असल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९-११-२००९ रोजी माहिती पुरविली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जि. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उपजिल्हाधिकारी (रोहयो), कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जि. एस. रायबोळे,<br>मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उपजिल्हाधिकारी (रोहयो), कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड- श्री. एम. व्ही. नरंगळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - परिवार प्रतिष्ठाण, नांदेड, स्वप्नील माधवराव जोंधळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९-११-२००९ |

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि. १५-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक २६-०८-२००९ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती, जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी दिनांक ०९-११-२००९ रोजी सुनावणी घेतली आहे व सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते त्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या समक्ष अपीलकर्त्यास माहिती पुरविण्यात आलेली आहे व त्यांचे समाधान झाले आहे.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन जन माहिती अधिकारी यांनी सांगितलेली माहिती बरोबर असल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९-११-२००९ रोजी माहिती पुरविली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जि. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उपजिल्हाधिकारी (रोहयो), कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. पंडीतराव शामराव पतंगे,<br>माळोदे गल्ली, गणपती मंदिराजवळ, हदगांव,<br>तालुका हदगांव, जिल्हा नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>उपविभागीय कार्यालय, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१३३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जिल्हा नांदेड<br>- प्रतिनिधी - श्री. आर. आर. आडे, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बिलोली | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-१०-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८-०६-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १८-०८-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०५-२००९ रोजी अपिलार्थीस दिलेली आहे व ती प्राप्त झाल्याची पोच अपिलार्थीने यांनी त्याच दिवशी या पत्रावर दिलेली आहे. हा पुरावा आज आयोगासमोर प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सादर केला. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ०८-०६-२००९ रोजी सुनावणी घेतली आहे व त्यावेळी अपिलार्थी यांनी दिनांक २२-०५-२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. परंतु अपिलार्थी यांनी सहा महिन्यानंतर अपील दाखल केले आहे, अशी नोंद घेतली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि त्यांना माहिती मिळाली असल्याने आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ३०-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पंडीतराव शामराव पतंगे, माळोदे गल्ली, गणपती मंदिराजवळ, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोतीराम गयबू काळे, : अपीलकर्ता
मु. जानापुरी, पो. वडेपुरी, एस. आर. टी. तालुका लोहा,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सहायक प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१३३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड - श्री. परमेश्वर गोपाळ माने | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड - श्री. रघुनाथ बामणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११-०६-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने दिनांक १४-०५-२००९ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिनांक ११-०६-२००९ रोजी देण्यात आलेली आहे. आज रोजी आयोगापुढे अपिलार्थीचे दिनांक १८-०५-२०१० रोजीचे पत्र आहे. या पत्रामध्ये अपिलार्थी यांनी त्यांना मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-याकडून प्राप्त झाली असून विचाराधीन व्दितीय अपील क्रमांक १३३७ मागे घेत असल्याने ते रद्द करण्यात यावे अशी आयोगास विनंती केली आहे. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापुरी, पो. वडेपुरी, एस. आर. टी. तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जि. एस. रायबोळे, : अपीलकर्ता
मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड - श्री. अ. दि. आजेगांवकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड - प्रतिनिधी - श्री. अशोक देवकरे, उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष सचिव अरुणोदय शिक्षण प्रसारक मंडळ हाडोळी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस माहिती मिळालेली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४ नोव्हेंबर २००९ रोजी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रावरुन असे आढळून येते की, त्यांनी दिनांक ३१-१०-२००९ रोजी सुनावणी घेतली असून अपीलकर्त्यास आठ दिवसाच्या आत माहिती द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीस दिनांक ०९-१२-२०१० रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली असून ती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे आणि त्याची पोच त्यांनी दिली आहे. याबाबतचा पुरावा आयोगास सुनावणीच्या वेळी सादर करण्यात आला.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९-१२-२०१० रोजी माहिती पुरविली आहे व त्याबाबतची अपिलार्थीने दिलेली पोच जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जि. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हर्षवर्धन किशनराव दवणे, : अपीलकर्ता
समतानगर, पावडेवाडी नाक्याजवळ, पो. यशवंतनगर,
नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शारदा भवन शिक्षण संस्थेचे आय. टी. एम. महाविद्यालय,
यशवंत महाविद्यालय परिसर, नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७१९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक, आय. टी. एम. महाविद्यालय, नांदेड - श्री. बोकारे माधव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड - प्रतिनिधी - श्री. दीपक देशपांडे, उच्च श्रेणाी लघुलेखक | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्रीमती अंजु गोवर्धन निलावार | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी तसेच जन अपिलीय अधिकारी उपस्थित नाहीत. त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरीम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३०-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हर्षवर्धन किशनराव दवणे, समतानगर, पावडेवाडी नाक्याजवळ, पो. यशवंतनगर, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक, आय. टी. एम. महाविद्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. क्षिरसागर मोतीराम तुकाराम,<br>तामसा रोड, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड - प्रतिनिधी - श्री. व्ही. टी. भालेराव, अव्वल कारकून | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९-०२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०३-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे पत्र दिनांक ०३-०२-२००९ अन्वये अपिलार्थीने मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे आपला अर्ज निकाली काढण्यात येत आहे. तसेच स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडे ही माहिती उपलब्ध आहे. आपण त्यांच्याकडून सदरील माहिती परस्पर घ्यावी असे कळविले आहे. या प्रकारे जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर यांनी अपिलार्थीस कळविणे योग्य नाही. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती स्वस्त धान्य दुकानदारांकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस द्यावी लागेल. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर यांनी या प्रकरणी व्यक्तिशः लक्ष पुरवावे व अपिलार्थीस देय असलेली माहिती संबंधित स्वस्त धान्य दुकानदाराकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी. अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

या प्रकरणात अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी विलंब झाला असल्यामुळे व प्रकरण योग्य प्रकारे हाताळले नसल्यामुळे तहसीलदार, अर्धापूर यांनी व्यक्तिशः ही माहिती प्राप्त करावी व आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. क्षिरसागर मोतीराम तुकाराम, तामसा रोड, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२. नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख अन्वर शेख मन्नु,<br>रा. लेबर कॉलनी, घर नंबर ४९, ब्लॉक नंबर ४,<br>नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड - श्री. वाळकीकर एस. एम. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड<br>- श्री. डॉ. भोपळे के. एस. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०३-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १२-०६-२००८ फेरसादर दि. ०९-१०-०९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, या व्दितीय अपिलावर राज्य माहिती आयोग औरंगाबाद खंडपीठ यांनी दिनांक १२-०८-२००९ रोजी सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीच्या दिनांक १२-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापीत करुन तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारीत करण्याचे आदेशित करुन अपील निकाली काढले होते. यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-१२-२००९ व ०५-०१-२०१० रोजी सुनावणी घेतली व अपिलार्थीच्या मूळ अर्जानुसार अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्यात यावी असे आदेशित केले आहे. त्याप्रमाणे दिनांक ०१-०२-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस माहिती पाठविली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३०-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख अन्वर शेख मन्नु, रा. लेबर कॉलनी, घर नंबर ४९, ब्लॉक नंबर ४, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विनोद भाऊसाहेब डोणगावकर,<br>बामनेजी निवास, जनार्धन नगर, साईबाबा मंदिराजवळ,<br>शोभानगरजवळ, आनंदनगर, नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड - श्री. अशोक देवकरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड - प्रतिनिधी - श्री. अशोक देवकरे, उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. ताटे व इतर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली काही माहिती अपिलार्थीस दिनांक १९-०७-२०१० रोजी देण्यात आली आहे व ही माहिती प्रत्यक्षात अपिलार्थी यांनी हस्तगत केली आहे त्याची नोंद आहे.

उर्वरीत माहितीची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणात आहे असे आढळून येत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६ ऑक्टोंबर २००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून ही माहिती बघण्याचे सूचित केले होते. तथापि ही प्रक्रिया पूर्ण झालेली दिसत नाही. तरी एक तारीख निश्चित करुन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली उर्वरीत माहिती पाहणी करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थीने मागितलेली उर्वरीत माहिती पाहण्याकरिता त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीस एक तारीख निश्चित करुन त्यांनी मागितलेली उर्वरीत माहिती पाहणी करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विनोद भाऊसाहेब डोणगावकर, बामनेजी निवास, जनार्धन नगर, साईबाबा मंदिराजवळ, शोभानगरजवळ, आनंदनगर, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पांडुरंग नारायण कदम, : अपीलकर्ता
मु. हस्सापूर, पो. हळदा, तालुका भोकर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, भोकर,
तालुका भोकर, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड - श्री. अनंतवाळ वाय. के. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड - प्रतिनिधी - श्री. अशोक देवकरे, उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-०४-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०७-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना दिनांक ३०-०४-२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविली आहे. यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०५-२००९ रोजी प्रथम अपील सादर होते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती मिळाली आहे, असे आयोगापुढे पुन्हा सांगितले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि आयोगापुढे अपिलार्थीचे दिनांक २०-१२-२०१० चे पत्र आहे यामध्ये त्यांनी त्यांना माहिती मिळाली असल्याचे नमूद केले आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पांडुरंग नारायण कदम, मु. हस्सापूर, पो. हळदा, तालुका भोकर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम,<br>घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड - श्री. वाळकीकर एस. एम. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड - डॉ. श्री. भोपळे के. एस. | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. गुरुगोविंद मेमोरियल हॉस्पिटल, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०९-१०-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०१-०८-२००९ रोजी हस्ते पोच दिली आहे. अपिलार्थीने सदरील माहिती स्वतः दिनांक ०१-०८-२००९ रोजी कार्यालयातून हस्तगत केली आहे व तशी पोचही जन माहिती अधिकारी यांना दिलेली आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीचे दिनांक २०-१२-२०१० रोजीचे आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आज आयोगासमोर आहे. या पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिका-याकडून प्राप्त झालेली आहे व त्यांची कोणतीही तक्रार नाही त्यामुळे विचाराधीन अपील क्रमांक १७६२/०९ रद्द करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि त्यांनी त्यांच्या दिनांक २०-१२-२०१० रोजीच्या पत्रान्वये त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, डॉ. शंकरराव चव्हाण

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिलीप वाघमारे नरसीकर, : अपीलकर्ता
मु. पो. नरसी, तालुका नायगांव, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
कार्यालय, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागीय
कार्यालय, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यालय, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागीय कार्यालय, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड - प्रतिनिधी - श्री. आर. आर. आडे, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बिलोली | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - मे. पाटील कन्स्ट्रक्शन, धानोरा | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९-०४-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५-०५-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०७-२००९ |

फेरसादर १६-०६-१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले की, अपिलार्थीने दिनांक ०७-०३-२००९ रोजी मागितलेली माहिती विहित मुदतीत माहिती अधिका-याने उपलब्ध ठेवली होती. तथापि अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते याकरिता त्यांची वाट पाहून त्यांनी दिनांक ०९-०४-२००९ रोजी नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस माहिती पाठविली. अपिलार्थीकडून संबंधित माहितीचे पाकीट 'घेण्यास इन्कार' अशी पोस्टाची नोंद होऊन परत आलेले आहे. सदर पाकिट आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास दाखविण्यात आले. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक २५-०५-२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला की, अपिलार्थी यांना पोस्टाने पाठविलेली माहिती स्वीकारुन उर्वरीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्विकारावी व जन माहिती अधिकारी यांनी येत्या चार दिवसात माहिती शोधून अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी दोघेही उपस्थित होते अशी नोंद जन अपिलीय अधिकारी यांच्या सुनावणीच्या विवेचनात घेण्यात आलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने पुढे आयोगास असेही सांगितले की, जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस पुनश्च दिनांक १९-०६-२००९ रोजी माहिती पाठविली तथापि ती पुन्हा वरीलप्रमाणे 'घेण्यास इन्कार परत' अशी पोस्टाची नोंद होऊन परत आलेली आहे. ही दोनही पाकिटे आज रोजी आयोगास दाखविण्यात आली. यावरुन जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी वेळोवेळी अपिलार्थीस माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला आहे असे दिसून येते. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले की, अपिलार्थीने आता दिनांक २८-१२-२०१० रोजी व्यक्तिशः माहिती घेतली आहे. याबाबत दिनांक २८-१२-२०१० रोजी अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर यांना लिहिलेल्या पत्राची प्रत सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सादर केली आहे त्यामध्ये त्याची नोंदही दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३०-१२-२०१०**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीप वाघमारे नरसीकर, मु. पो. नरसी, तालुका नायगांव, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यालय, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागीय कार्यालय, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, | : | अपीलकर्ता |
| रा. दाना बाजार, जालना | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना | | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१०७६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, जालना | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०६-१२-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०३-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आयोगास खालील बाबी दिसून आल्या आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्या दुकानामधून शालेय पोषण आहारासाठी धान्य दिले जाते त्यांचे नाव व परिमाण याची गावनिहाय माहिती, दारिद्र्यरेषेखालील लाभधारकांची गावनिहाय यादी व पुरावे, अन्नपुर्णा योजनेची कार्ये व गावनिहाय यादी, अंत्योदय योजनेची कार्ये व गावनिहाय यादी अशी सन २००५ ते ०८ या कालावधीशी संबंधित माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जालना यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १४-०६-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नव्हते. यानंतर या प्रकरणात दिनांक २१-१०-२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली. तथापि जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीमुळे ही सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज दिनांक ३१-१२-२०१० रोजी घेण्यात आली.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून दिनांक १४-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जाच्या पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधण्याचे उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. त्याप्रमाणे या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्व कशा प्रकारे पार पाडले आहे हे आयोगास संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे व आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. तथापि अपिलार्थीने तहसीलदार, जालना यांना दिनांक १९-०१-२००९ रोजी लिहिलेल्या पत्रावरुन असे आढळून येत आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे या प्रकरणाशी संबंधित दिनांक १९-०१-२००९ रोजी सुनावणी ठेवली असता, अपिलार्थी हे सकाळी १०.०० वाजल्यापासून दुपारी २.३० वाजेपर्यंत त्यांच्या कार्यालयात उपस्थित होते. परंतु त्यांच्या प्रथम अपील अर्जाची तहसीलदार, जालना यांनी सुनावणी घेतली नाही. यावरुन असे सिध्द होत आहे की, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीसाठी संपर्क साधला होता. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-११-२००९

रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नाहीत. तसेच दिनांक १४-०६-२०१० सुध्दा सर्वजण अनुपस्थित होते. दिनांक २१-१०-२०१० रोजीच्या सुनावणीस फक्त अपिलार्थीस उपस्थित होते. याबाबत जिल्हाधिकारी, जालना यांनी संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचा खुलासा मागवावा आणि त्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द प्रशासकीय कार्यवाही योजावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. त्याकरिता अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी एक दिवस निश्चीत करुन कळविण्यात यावा.

२. जिल्हाधिकारी, जालना यांनी संबंधित जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, जालना व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना यांचा खुलासा मागवावा आणि त्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द प्रशासकीय कार्यवाही योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, रा. दाना बाजार, जालना.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| सौ. एस. पी. नैण,<br>व्दारा, मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१३१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. पुर्णे विष्णू सखारामजी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०५-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष सर्वजण अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परभणी यांच्याकडे दिनांक २६-११-२००८ रोजी पोस्टाने अर्ज पाठवून दिला असता, माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दिनांक १०-१२-२००८ अन्वये त्यांनी मागितलेल्या माहितीचे रजिस्टर उपलब्ध नसल्याचे त्यांना कळविल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परभणी यांच्याकडे दिनांक ०२-०२-२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले असता या अपील प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०३-२००९ रोजी निर्णय देऊन, नियमबाह्य निर्णय पारीत केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. पुर्णे विष्णू सखारामजी रा. माळसोना, तालुका परभणी यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दिनांक ३०-०७-९० रोजी दिलेल्या **"हटकर"** जातीच्या प्रमाणपत्रासाठी अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जातीचे प्रमाणपत्र घेण्यासाठी दाखल केलेल्या आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्यप्रती आणि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या दिनांक ३०-०७-९० रोजीच्या आवक जावक रजिस्टरच्या सत्यप्रती, अशी माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे नियमबाह्य आदेश पारीत केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०६-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नव्हते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करताना त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत त्यांच्या कथित माहितीसाठीच्या अर्जाची व त्यावरील अपील अर्जाची प्रत या अर्जासोबत जोडली आहे. अपिलार्थीने सदरचा पत्रव्यवहार पोस्टाने केला आहे. परंतु या संदर्भात कोणताही सबळ पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. एवढेच नव्हे तर अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २१-०३-२००९

रोजीच्या कथित निर्णयाची प्रत देखील त्यांनी व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेली नाही. आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज करताना सदरचे अपील ज्या अपिलाच्या निर्णयाविरुध्द अपिलार्थीस करावयाचे आहे त्याची प्रत अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील करताना जोडणे त्यांना अनिवार्य आहे. परंतु या निर्णयाची प्रत अपिलार्थीने आयोगास उपलब्ध करुन न दिल्याने आणि सुनावणीसाठी स्वत:ही उपस्थित नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्या-योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला होता.

या प्रकरणात या आधी दिनांक २८-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष सर्वजण गैरहजर होते. त्यानंतर पुन्हा दिनांक २८-१०-२०१० रोजी प्रकरण सुनावणीसाठी लावण्यात आले त्यावेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि त्रयस्थ पक्ष उपस्थित होते. आयोगासमोर संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थितीत सविस्तर माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे म्हणून सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन आज रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाही त्यामुळे वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. एस. पी. नैण, व्दारा, मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम,<br>घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासकीय अधिकारी, शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड - डॉ. भोपळे के. एस. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक १८-०७-२००९ रोजी नोंदणीकृत टपालाव्दारे देण्यात आलेली आहे व त्याची पोस्टाची पोच त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीने दिनांक २०-१२-२०१० रोजीचे आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आज आयोगासमोर आहे. या पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, विचाराधीन व्दितीय अपील संदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना आता जन माहिती अधिका-याकडून प्राप्त झालेली आहे व त्यांची कोणतीही तक्रार नाही त्यामुळे विचाराधीन अपील क्रमांक १७८३/०९ रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ३१-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पूरभाजी हनमंतराव शिंदे, : अपीलकर्ता
लोणी खूर्द, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड,
तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड,
जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. नारायण परबता लखे व इतर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०-०४-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२-०५-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०६-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रामधील जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुदखेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ०२-०५-२००९ रोजी घेतलेल्या निर्णयावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २८-०३-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता व लगेच दिनांक ०४-०४-२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी माहितीसाठीचा अर्ज केल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम अपील केल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड यांनी विहित मुदतीच्या आत म्हणजे दिनांक २०-०४-२००९ रोजी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी विषय क्रमांक २ ची उर्वरित माहिती विनामूल्य अपिलार्थीस द्यावी असे जन माहिती अधिका-यास निदेश दिलेले दिसत आहे. त्याप्रमाणे माहिती दिली किंवा कसे ही बाब आयोगास अवगत होऊ शकत नाही. तरी माहिती दिली नसल्यास जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. या पार्श्वभूमीवर प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपिलावरील निर्णय कायम ठेऊन आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीपैकी विषय क्रमांक २ ची उर्वरित माहिती अपिलार्थीस, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पूरभाजी हनमंतराव शिंदे, लोणी खूर्द, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका

मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा,<br>रहेमान मंजील, घर क्र. ९-६-२२०, उमर कॉलनी,<br>मस्जीदसमोर, देगलूर रोड, नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड<br>- श्री. संजय वसंतराव पार्डीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड - श्री. अविनाश त्र्यंबक धोंडगे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२-०३-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४-०२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०४-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०१-१२-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०२-०३-२००९ रोजी नोंदणीकृत टपालाने पुरविण्यात आलेली आहे व अपिलार्थीस ही माहिती दिनांक ०४-०३-२००९ रोजी प्राप्त झाल्याची नोंद त्यांच्या कार्यालयात आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेताना नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सुमारे ५६ दिवसांचा विलंब झाला आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक हे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अन्वये शास्तीस पात्र आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. व्ही. व्ही. मुळे) तसेच अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या कर्मचा-यांकडे जतन केली जाते व त्यांनी ती जन माहिती अधिका-यास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे असे प्रथम लिपिक (श्री. जी. ए. देशपांडे) हे जबाबदार आहेत. याकरिता या दोघांनाही अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने माहिती पुरविण्याबद्दल त्यांच्यावर एकत्रित शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा द्यावा लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. व्ही. व्ही. मुळे) उप कार्यकारी अभियंता व तत्कालीन प्रथम लिपिक (श्री. जी. ए. देशपांडे) व संबंधित वरिष्ठ लिपिक यांच्यावर एकत्रित रुपये १४,००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा त्यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांच्यामार्फत आयोगास हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, रहेमान मंजील, घर क्र. ९-६-२२०, उमर कॉलनी, मस्जीदसमोर, देगलूर रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाबुराव नामदेव गबाळे, : अपीलकर्ता
रा. भवानीनगर, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कार्यालय आगार व्यवस्थापक, कंधार आगार,
तालुका कंधार, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, :
राज्य परिवहन, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा आगार प्रमुख, राज्य परिवहन, कंधार, जिल्हा नांदेड - श्री. अमोल चंद्रकांत गोंजारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन कार्यालय, नांदेड - प्रतिनिधी - यंत्र अभियंता (चा), राज्य परिवहन कार्यालय, नांदेड- श्री. आर. एन. बनसोडे | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. भानुदास रावजी घुगे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने दिनांक ३१-०८-२००९ रोजी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जावर त्यांना दिनांक ०७-०९-२००९ रोजी माहितीपोटीचे आवश्यक शुल्क भरण्याचे कळविण्यात आले आहे. यावर ते शुल्क बरोबर नाही म्हणून अपिलार्थीने जन माहिती अधिक-यास कळविले आहे व त्यानंतर रुपये २८ इतके शुल्क भरण्याचे जन माहिती अधिका-याने कळविले व अपिलार्थीने त्याचा भरणा केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४-०९-२००९ रोजी अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. त्यानंतर दिनांक ०१-१०-२००९ रोजी माहिती देण्यात आली हे अपिलार्थीस मान्य आहे. तथापि अपिलार्थीचे म्हणणे आहे की, काही माहिती अपूर्ण आहे ती खालीलप्रमाणे आहे.

१. मुद्दा क्रमांक ३ - प्रत्येक स्टेज / टप्पा किती किलोमीटरचा आहे याबाबत खात्याच्या व वरिष्ठांच्या आदेशाच्या साक्षांकीत प्रती देण्यात याव्यात.

२. मुद्दा क्रमांक ४ - अपिलार्थीने दिनांक १६-०७-२००५ रोजी तक्रार केली होती त्यावर केलेल्या कार्यवाहीच्या टिपणीची झेराक्स प्रत द्यावी.

३. मुद्दा क्रमांक ५ - प्रवाशांनी वाहक, चालक आणि एस. टी. कर्मचा-यांच्या विरुध्द तक्रार केल्यास किती दिवसात अर्जदाराला कळविले जाते याबाबत महामंडळ व खात्याच्या आदेशाच्या झेरॉक्स प्रती द्याव्यात.

४. मुद्दा क्रमांक ७ - अपिलार्थीने दिनांक १६-०७-२००५ रोजी तक्रार दिली होती ती तक्रार नोंदणी केलेल्या आवक रजिस्टरची दिनांक १६-०७-२००५ ते १८-०७-२००५ ची झेराक्स प्रत द्यावी.

५. मुद्दा क्रमांक ८ - मधील कर्मचा-यांच्या तपशीलाबबत वाहक, चालक व कंधार डेपोमधील वाहतूक नियंत्रक यांची माहिती तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे मूळ गाव वगळून देण्यात यावी.

६. मुद्दा क्रमांक १४ - तक्रार पुस्तक ठेवण्याबाबतचे विभागाचे आदेश किंवा परिपत्रकाच्या झेरॉक्स प्रती द्याव्यात.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली व वर नमूद केल्याप्रमाणे १ ते ६ मुद्दयांवरील माहितीच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ३१-१२-२०१०**

-------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबुराव नामदेव गबाळे, रा. भवानीनगर, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा आगार प्रमुख, राज्य परिवहन, कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सूर्यकांत जी. पटणे, : अपीलकर्ता
रा.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, देगलूर,
जि. नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,तहसील कार्यालय, देगलूर, जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय,देगलूर, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय,देगलूर,जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. वड्डे मन्मथ वैजनाथ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | १२-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २४-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २८-०४-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्रयस्थ पक्ष श्री. वड्डे मन्मथ वैजनाथ उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी आयोगासमोर आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने मागितलेली माहिती म्हणजे मूळ जातीच्या प्रमाणपत्राची संचिका तहसीलदार,देगलूर यांच्याकडे आहे. ही बाब उपविभागीय अधिकारी, देगलूर यांनी अपिलार्थीस कळविलेली आहे व त्याप्रमाणे त्यांनी तहसील कार्यालय,देगलूर यांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी, असे कळविले आहे. त्यामुळे तहसीलदार,देगलूर यांना अपिलार्थी यांनी मागितलेल्या त्रयस्थ पक्षासंदर्भातील माहितीच्या छायांकित प्रती द्याव्या लागतील.त्याचप्रमाणे विलंबाबाबत जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार आहेत, त्यांचा खुलासा घेऊन तहसीलदार यांना स्वतःच्या खुलाशासह आयोगास सादर करावा लागेल.प्रकरणातील संदर्भित माहितीसाठीचा मूळ अर्ज निकाली काढण्यासाठी विलंब झालेला आहे. तरी तहसीलदार, देगलूर यांनी व्यक्तिशः बघावे व प्रकरण निकाली काढावे.

अतः आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय,देगलूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहितीची साक्षांकित प्रत आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील माहिती पुरविण्यास विलंब झाला असल्याने संबंधित तहसीलदार,देगलूर यांनी संबंधित जन माहिती अधिकारी/कर्मचाऱ्यांचा खुलासा घेऊन स्वतःच्या खुलाशासह आयोगास हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक : ३१-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सूर्यकांत जी.पटणे,संगिता प्रिंटर्स, विनायकनगर,नांदेड

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय,देगलूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार तहसील कार्यालय,देगलूर, जि.नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तहसीलदार, देगलूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संघरत्न एस.नरवाडे,<br>रा.नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,तहसील कार्यालय (गौण खनिज),<br>नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार (गौण खनिज),नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,नांदेड - श्री. पी. के. राठोड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. राजू भंडारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १) २७-०२-२००९<br>२) ०६-०४-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १७-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | ०६-०४-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०१-०७-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात त्यांनी प्रथम दि. २७.०२.२००९ रोजी अपिलार्थीस कळवून दि. ०६.०४.२००९ रोजी एकूण १७ पृष्ठांची माहिती अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे अपिलार्थीस पाठविण्यात आली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ०६.०४.२००९ रोजी निर्णय घेताना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती द्यावी, असे सूचित केले होते. त्यावेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते व अपिलार्थी अनुपस्थित होते. आज रोजी सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता येऊ शकली नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे आढळून येत आहे.

अतः आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संघरत्न एस.नरवाडे,रा. सावित्रीबाई फुले नगर, श्रावस्तीनगरच्या बाजूस, ता.जि.नांदेड-४३१ ६०२.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रामकिशन लक्ष्मणराव एमेकर,<br>रा.धर्माबाद,जि.नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता व प्रशासक,<br>लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता व प्रशासक,<br>लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.रामकिशन लक्ष्मणराव एमेकर व त्यांचे सहायक | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -कार्यालयीन अधीक्षक तथा प्रथम लिपीक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,औरंगाबाद - श्री. आर.जी.तांगडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,औरंगाबाद- श्री. एम.बी.टकले | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-०४-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८-०५-२००९ |

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि. ०७-०९-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्यांचे सहायक, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती तसेच अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, अपिलार्थी यांनी दि. २०.०३.२००९ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस दि. ३०.०४.२००९ रोजी पुरविण्यात आलेली आहे. अपिलार्थीने सुनावणीच्यावेळी ही बाब मान्य केली. तथापि त्यांना काही माहिती अपूरी वाटत आहे, असे त्यांनी सांगितले.जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि. २८.०५.२००९ रोजी निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयामध्ये असे नमूद केले आहे की, 'अपिलकर्ता त्यांना मिळालेली माहिती चूक आहे, असे दर्शवू शकले नाहीत.' तथापि त्यांना ही संधी आयोगातर्फे आज रोजी पुन्हा देण्यात आली. त्यावेळी त्यांना खालील मुद्यांसंदर्भातील माहिती मिळालेली नाही, असे त्यांनी आयोगासमोर सांगितले.

१.	मुद्दा क्रमांक २ : - या संदर्भात ज्या कर्मचाऱ्यांनी त्यांची प्रकरणे उच्च न्यायालय/सर्वोच्च न्यायालयात दाखल केली नव्हती तथापि त्यांना सेवेत सामावून घेण्यात आले आहे, अशा कर्मचाऱ्यांची माहिती/यादी मिळालेली नाही.

२.	मुद्दा क्रमांक ५ : - या संदर्भात अपिलार्थीच्या दि.२७.०८.२००८ रोजीच्या अर्जावर झालेल्या पुढील कार्यवाहीची माहिती व पत्रव्यवहार ज्या नस्तीमध्ये आहे, त्या संपूर्ण नस्तीची साक्षांकित प्रत, ही माहिती मिळालेली नाही.

वरील दोन मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे दोन मुद्यांवरील माहितीच्या प्रमाणित साक्षांकित प्रती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक :	३१-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामकिशन लक्ष्मणराव एमेकर,रा. देवीरोड, धर्माबाद, ता.धर्माबाद, जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक तथा प्रमुख लिपीक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. पुरभाजी हनमंतराव शिंदे,<br>रा.लोणी खु. ता.अर्धापूर,जि.नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, सजा लोण (बु.),<br>ता.अर्धापूर, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार अर्धापूर, जि. नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तलाठी, सजा लोणी (बु.),<br>ता.अर्धापूर, जि.नांदेड- श्री. एन. के. वाघमारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, अर्धापूर,जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२-०३-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०६-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा लोणी (बु.) यांनी आज रोजी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीच्या दि. ०६.०२.२००९ रोजीच्या अर्जासंदर्भात व त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थीस दि. ०२.०३.२००९ रोजी कळविण्यात आले आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.०३.२००९ रोजी प्रथम अपील केल्याचे दिसून येत आहे. यावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी अथवा कोणताही निर्णय घेतलेला दिसून येत नाही. अपिलार्थी आज रोजी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि मिळालेल्या माहितीवर त्यांचे समाधान झाले नसल्यास ते तहसीलदार, अर्धापूर यांच्याकडे तक्रार करु शकतात. त्यावर योग्य माहिती पुरविण्याची जबाबदारी तहसीलदार यांची राहील.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पुरभाजी हनमंतराव शिंदे, रा.लोणी खु. ता.अर्धापूर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा लोणी (बु.), ता.अर्धापूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,अर्धापूर, ता.अर्धापूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोहम्मद अन्वरउल्ला खान,<br>रा.नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता,<br>सा.बां.विभाग, भोकर,नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, भोकर, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,भोकर,जि.नांदेड- श्री. विजयसिंह गहेरवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, भोकर, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना मागितलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर यांच्या दि. ०४.०९.२००९ रोजीच्या पत्रासोबत एकूण ९१ पृष्ठांची माहिती त्यांच्या घरी दि. ०६.०९.२००९ रोजी नेऊन देण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेताना, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जात मागितलेली माहिती स्वतः हस्तगत करण्याबाबत नमूद केलेले असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०६.०९.२००९ रोजी माहिती दिली आहे, असे नमूद केले आहे. अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. माहिती पुरविण्यास जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक यांच्याकडून विलंब झालेला आहे, असा विलंब भविष्यात होणार नाही, याची सर्व संबंधितांनी दक्षता घेणे आवश्यक आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-१२-२०१०** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहम्मद अन्वरउल्ला खान ,रा.९-४-४५५,कय्युम प्लॉट्स, नांदेड-४३१ ६०४.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, : अपीलकर्ता
रा.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
कुरेशिया ऊर्दू प्राथमिक शाळा,नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापिका, कुरेशिया ऊर्दू प्राथमिक शाळा,नांदेड- श्रीमती फहिम सुलताना गुलाम मोहीयोद्दीन | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा.),जि.प.नांदेड-प्रतिनिधी श्री. पी.एम.भोखरे,कक्ष अधिकारी. | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्रीमती मलेका बेगम युसूफोद्दीन | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २७-०७-२००९

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. -

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-११-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, कुरेशिया ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती दि. २८.१२.२०१० रोजी पाठविण्यात आली आहे. ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे. अपिलार्थी यांनी दि. ३०.१२.२०१० रोजी शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद, नांदेड यांना असे कळविले आहे की, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपील क्र. १७९८/०९ या अपील अर्जासंदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना मिळाली आहे व संदर्भित अपील रद्द करण्यात यावे.

अतः आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक : ३१-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम,रा.घर नं. ९-४-१०६१, रामरहीमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड-४३१ ६०४.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कुरेशिया ऊर्दू प्राथमिक शाळा, खरा ईमाम मनियारगल्ली, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जी. एस.रायबोळे, : अपीलकर्ता
रा.किनवट,जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट शिक्षणाधिकारी,
किनवट, जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट,जि.नांदेड- श्री. आजेगावकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा.),जि.प.नांदेड-प्रतिनिधी श्री. पी.एम.भोखरे,कक्ष अधिकारी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४-११-२००९ |

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि. १५-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २६.०८.२००९ च्या अर्जान्वये काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. त्यानुसार दि. २५.०९.२००९ रोजी संपूर्ण माहिती त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी - श्री. वाय.एस.शेंडे (वरिष्ठ सहायक) व एस.व्ही.मेश्राम (शिक्षक) यांच्यामार्फत पाठविण्यात आली होती व त्यासंबंधीची पोच द्यावी अशी अपिलार्थीस विनंती करण्यात आली होती. तथापि अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारली नाही. यासंदर्भातील कागदपत्रे त्यांनी आयोगासमोर सुनावणीच्यावेळी सादर केली आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू आयोगास अवगत झाली नाही.

अतः आयोगामार्फत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली व त्यांना देऊ केलेल्या संपूर्ण माहितीच्या प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जी. एस.रायबोळे, मुख्य संपादक, सा.धुमाकूळ, किनवट, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| सौ. सुरेखा चंपतराव पाटील,<br>रा. संभाजीनगर, तरोडा (बु.), नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,<br>हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर,<br>तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड - श्री. पैलवाड एन. डब्ल्यू. | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. संतोष शेषराव शिंदे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि. ०७-०२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०८-१२-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी या अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ३१-०७-२०१० रोजीचे पत्र आज आयोगासमोर आहे. या पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना दिनांक ३१-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती मिळवून दिली आहे व त्यांचे समाधान झाले आहे. ही बाब विचारात घेता प्रश्नाधीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब झालेला आहे त्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार शास्ती लावणे आवश्यक ठरत आहे. याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिमायतनगर श्री. एम. एम. कांबळे यांना रुपये २५००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत आयोगास सादर करावा.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिमायतनगर श्री. एम. एम. कांबळे यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्यास कसूर झाल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार रुपये २५००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-१२-२०१०**

---------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. सुरेखा चंपतराव पाटील, रा. संभाजीनगर, तरोडा (बु.), नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. श्री. एम. एम. कांबळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड)

४. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.